प्रकरणामध्ये जी तपासणी मुख्याधिकारी यांनी केलेली आहे व त्यासंदर्भामध्ये वारंवार असे विश्लेषणात्मक किंवा प्रश्नोत्तराच्या संदर्भातील अर्ज/अपीले हे अपीलकर्ता दाखल करतात. अपीलकर्ता वारंवार तीच ती अर्ज वेगवेगळया तारखांना करतात, तीच ती प्रथम अपीले वेगवेगळया तारखांना करतात व तीच ती द्वितीच अपीले वेगवेगळया तारखांना राज्य माहिती आयोगाकडे दाखल करतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचा हेतू हा मुख्याधिकारी, नगर परिषद, रिसोड, तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व राज्य माहिती आयोग यांना वेठीस धरण्याचा दिसतो. वास्तविक, अशा निरर्थक अर्जामधून अपीलकर्ता यांना काय साधावयाचे आहे हे कळू शकत नाही. परंतु, तरी सुध्दा अपीलकर्ता हे अर्ज करीत असतात व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १७०७/२००७, १७०८/२००७, १७०९/२००७ व १७१०/२००७ हे खारीज करण्यास पात्र आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक :-३०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

२३.३.२००५ रोजी घोषीत केले त्यावर मे. मुख्याधिकारी नगरपरिषद रिसोड हयांनी आदेशाची अवहेलना कोर्ट आदेशाचा भंग केलेला आहे. कोर्ट आदेशाचा भंग का करण्यात आला जाणिव पूर्वक दिरंगाई करण्यात आली."

सदरची माहिती हातोहात व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. व त्या कोर्ट आदेशाचा भंग कां करण्यत आला, जाणिवपूर्वक दिरंगाई करण्यात आली. याबध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मुख्याधिकारी, नगरपरिषद, रिसोड यांनी उत्तर दिलेले आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.४.२००७ रोजी दिला असून अपीलार्थी यांनी अर्जात नमूद केलेली माहिती ही माहितीच्या विचार धोरणाशी विसंगत असल्यामुळे त्यांच्या अपील अर्जाचा विचार करता येत नाही असा निर्णय दिलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

प्रथम अपीलाच्या निर्णयाचा विचार करता अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००७ रोजी वर नमूद केल्याप्रमाणे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून यते की, अपीलकर्ता यांना मा.न्यायालयाच्या आदेशाचा भंग कां करण्यात आला याबाबतची माहिती त्यांनी विचारलेली दिसून यते. वास्तविक न्यायालयाच्या आदेशाचा भंग झालेला असेल तर त्याकरीता कंटेप्ट ऑफ कोर्ट (Contempt of Court) कायदा आहे. व त्याकरीता मा. न्यायालयाकडेच त्यांच्या आदेशाचा भंग झाला या बध्दलची तक्रार करता येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही निर्णय प्रक्रियेतील स्पष्टीकरण मागता येत नाही. तर "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, शासन निर्णय, परिपत्रके, टिपण्या इ.च्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा "माहितीचा अधिकार" आहे. परंतु, अपीलकर्ता यांच्या मागील सर्व अपीलामध्ये तसेच आज निर्णयात असलेल्या अपीलाच्या मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारे माहिती ही त्यांनी मागितलेली नाही. व तसे मागिल

त्यामुळे शासकिय वेळ व श्रम वाया घालवित असल्याचे लक्षात आले त्यामुळे अपीलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज खारीज करण्यात येते आहे असा निर्णय दिलेला दिसून यतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अर्ज दिनांक २२.२.२००७ चे अवलोकन केले असता मे.व्यवहार न्यायाधिश साहेब रिसोड यांच्या दिनांक २१.३.२००५ च्या घोषित आदेशाची अवहेलना, जाणिवपूर्वक न्यायालयाचा अवमान याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात यावे असे त्यांनी विचारलेले आहे. मा. न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना झालेली असल्यास त्याकरीता त्यांना कंटेम्प्ट ऑफ कोर्ट (Contempt of Court) हा कायदा आहे व त्या कायदयाप्रमाणे अर्ज हा न्यायालयाकडे करावयाचा असतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जे स्पष्टीकरण मागितलेले आहे ते "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा त्याच एकाच अर्जाच्या संदर्भामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे पुन्हा दोन वेगळया तारखेस अपील दाखल केले आहे. व त्यावरुन सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निष्कर्ष काढलेला आहे तो योग्य आहे असे म्हणता येईल. अपीलकर्ता हे अनावश्यक अर्ज करतात तसेच अनावश्यक एकच अपील सुध्दा वेगवेगळया तारखांना आयोगाकडे दाखल करतात. तसेच दिनांक ११.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक १६०९/२००७, १६१०/२००७, १६१४/२००७ ही सुध्दा एकच अपील होती. परंतु वेगवेगळया तरखेस दाखल केली होती व त्यामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरुपामध्ये माहिती मागितली होती. व त्यामुळे ती अपीले सुध्दा खारीज करण्यात आली होती. त्यामुळे सदरचे वर नमूद केल्याप्रमाणे दोनही अपीले हे खारीज करण्यास पात्र आहे.

अपील क्रमांक १७०९/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००७ रोजी पुन्हा मे.व्यवहार न्यायाधिश, रिसोड यांच्या आदेशाचा भंग, अवहेलना, जाणिवपुर्वक दिरंगाई करण्यात आली याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " मे. व्यवहार न्यायाधिश रिसोड ळयांनी प्लॉट नं.८८ हयाच्या मालकी हक्क संबंधाने मालक म्हणून सौ. विमलबाई वसंतराव डांगे हयांना दि.

अर्जदार यांनी ४ मुद्यांमध्ये मागितलेली माहिती ही "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. अपीलकर्ता यांना मुख्याधिकारी, नगर परिषद, रिसोड सुनावणी दरम्यान गैरहजर होते वगैरे याची कारणे पाहिजे होती व त्यांच्या विरुध्द कार्यवाही करावयाची विनंती. परंतु अशा प्रकारची कारणे ही माहितीच्या अधिकारात विचारता येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १७०८/२००७ व १७१०/२००७ हे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००७ रोजी केलेल्या एकाच अर्जाच्या संदर्भात आहे. त्यामुळे दोनही अपीलाची सुनावणी ही एकत्रित घेण्यात येत आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.२.२००७ च्या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :" मे.व्यवहार न्यायाधिश साहेब रिसोड ळयांच्या दि. २१.३.२००५ च्या घोषीत आदेशाची अवहेलना. १) मुख्याधिकारी न.प.रिसोड पत्र क्रं.१/०६ दि.१.४.०६  २) मुख्याधिकारी न.प.रिसोड पत्र क्रं. ७/०६, दि. १०.४.०६ ३) मुख्याधिकारी न.प.रिसोड पत्र क्रं.५८/२००७ दि. ६.२.०७ मे.व्यवहार न्यायाधिश रिसोड हयांच्या दि. २१.३.०५ रोजी मालक म्हणून घोषना केल्यानंतर वरीलप्रमाणे आदेशावर ताशीरे अेढलेले आहेत. नगर परिषदेच्या कोणत्या नियमानुसार कोर्ट आदेशाची अवहेलना करण्यात आली त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे."

सदरच्या अर्जाप्रमाणे दिनांक २.३.२००७ रोजी त्यांना उत्तर दिलेले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने श्री डांगे हे अनावश्यकपणे अर्ज करीत असल्याचे पत्राची पडताळणी करताना आढळून आलेले असून जावक क्रमांक ४३३, दिनांक ६.६.२००७ अन्वये अर्जातील माहिती ही संबंधीतास पुरविण्यात आलेली असल्याचे तसेच काही बाबी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात व कार्यपध्दतीबाबत असल्याचे माझ्या निदर्शनास आले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने श्री डांगे हे अनावश्यकपणे अर्ज करीत असल्याचे व

अपीलीय कार्यालय अमरावती येथे नगर परिषदेचे कामकाज सोडून कशा करिता हजर होते. अधिकाराचा गैरवापर. ३) आपल्या पत्र क्रं.९६०/०६ दि. ८.१२.२००६ नुसार ता ७.११.२००६ चे अर्ज कोणता होता. ४) माझ्या दि. ४.११.२००६ च्या अर्जाची माहिती मिळालेली नाही. हेतुपुरस्पर टाळाटाळ केली. त्वरीत माहिती मिळावी. मे. अपीलीय अधिकारी अमरावती सुनावणी दि. २३.१.२००७ रोजी आहे. मुदतपूर्व माहिती द्यावी. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.१.२००७ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, रिसोड यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिनांक ९.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरचे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त यांनी दिनांक ९ मे, २००७ रोजी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती दिलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये व अर्जदाराच्या अर्जाच्या संदर्भामध्ये श्री डांगे यांचा अर्ज हा प्रश्नोत्तराच्या स्वरुपात व कार्यपध्दतीबाबत असल्याचे व त्यामुळे शासकिय वेळ व श्रम वाया घालवित आहे असे विश्लेषण केलेले आहे. श्री डांगे हे अनावश्यकपणे अर्ज करीत असल्याचे पत्राची पडताळणी करण्यात आलेली असून जावक क्रमांक ३५५, दिनांक ८.५.२००७ अन्वये अर्जातील माहिती ही संबंधीतास पुरविण्यात आलेली असल्याचे तसेच काही बाबी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात व कार्यपध्दतीबाबत असल्याचे माझ्या निदर्शनास आले. व श्री डांगे हे अनावश्यकपणे अर्ज करीत असल्याचे व त्यामुळे शासकिय वेळ व श्रम वाया घालवित असल्याचे लक्षात आल्यामुळे तसेच त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज खारीज करण्यात येते आहे असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णया वरुन अपीलकर्ता यांचे दिनांक १५.१.२००७ च्या अर्जातील वर नमूद माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता

पाठविण्यात आला नाही किंवा त्यांना मिळालेला नाही. मात्र प्रथम अपील त्यांच्याकडे सादर झाले होते.. प्रथम अपील हे वनपरिक्षेत्राधिकारी यांचेकडे दाखल केले होते. त्यांचे असे म्हणणे आहे की ते प्रथम अपीलीय अधिकारी नसल्यामुळे सदरचा अर्ज हा वरिष्ठ अधिका-यांकडे पाठविण्यात आला होता. परंतु, माहिती ही व्यापक प्रमाणात असल्यामुळे माहिती त्यांना उपलब्ध करुन देवू, असे तोंडी बोलणे झाले होते. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की माहिती त्यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती त्यामुळे तोंडी बोलण्याला कोणताही अर्थ नाही.

वरील वस्तुस्थितीवरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी तसेच सहाय्यक माहिती अधिकारी व कर्मचारी हे माहिती उपलब्ध न करुन देण्यास जाबाबदार दिसून येतात. संबंधीत वनपाल हे जरी माहिती अधिकारी नव्हते तरी त्यांनी तसा अर्ज हा माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करुन त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळवावयास पाहिजे होते किंवा संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अर्ज आल्यानंतर अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. प्रथम अपील हे वन परिक्षेत्राधिकारी यांचेकडे जरी दाखल केले होते तरी त्यांनी तरी वरिष्ठ अधिका-यांकडे प्रथम अपील हे हस्तांतरीत केले असल्यामुळे तसे अपीलकर्ता यांना कळवावयास पाहिजे होते. परंतु अपीलकर्ता यांना अशा कोणत्याही प्रकारे कळविण्यात आलेले नाही. किंवा माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील हे हस्तांतरीत केले आहे याबध्दलचा पत्रव्यवहार सुध्दा दाखल करण्यात आलेला नाही. तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा माहितीचा अर्ज दाखल करताना तो संबंधीत माहिती अधिकारी यांचेंकडे दाखल करणे हेही तेवढेच बंधनकारक आहे. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना जसा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे तसा तो अपीलकर्ता अर्जदार यांना सुध्दा लागू आहे. माहितीचा अर्ज कोणत्याही अधिका-याकडे देवून तो हस्तांतर करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी अपेक्षा अर्जदारांस करता येणार नाही. माहिती विहित मुदतीत उपलब्ध व्हावी त्याकरीतांच अधिनियमाच्या कलम ५ मध्ये सार्वजनिक प्राधिकरणा मध्ये ज्या ज्या स्तरावर माहिती असेल त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. अपवाद म्हणून हस्तांतरण करणे आहे. असे असले तरी

शासकिय जमीन. C) सदरचे शेत भोगवटा वर्ग २ मध्ये असल्यास मा. उपविभागीय अधिकारी (महसुल विभाग) यांचे मालकी हक्क प्रमाणपत्र किंवा परवानगी पत्र श्री जाधव यांनी सदरच्या केस सोबत आपणाकडे सादर केले आहे काय. सादर केले असल्यास सदरच्या परवानगी पत्राची प्रत दयावी. D) सन २००५ ते २००७ पर्यंतच्या भोगवटा वर्ग २ चे जेवढे सव्हे नं. आपल्या सर्कलमध्ये मंजूर करण्यात आले अशा सर्व सव्हे नंबरच्या शेत मालकांची यादी व मा. उपविभागीय अधिकारी यांच्या मालकी हक्क प्रमाणपत्राच्या लेखी प्रती दयाव्या. E) पाटा पांगरा सर्कलमध्ये रस्ते जळाईचे काम कुठे कुठे करण्यात आले. चालु आर्थिक वर्षात रस्ते जळाईच्या कामाकरीता आजपर्यंत किती रक्कमेचे व्हाऊचर बनविण्यात आले व प्रस्तावित कामे किती शिल्लक आहे. या रस्ते जळाईच्या कामासाठी रोजगार हमी योजनेच्या कार्डधारकांची यादी देण्यात यावी. F) आपल्या सर्कलमध्ये २००५-२००६ या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती सागवानी थुटयाचा पी.ओ.आर. जारी करण्यात आला. G) सन २००५-२००७ या वर्षात किती बंधारे आपल्या सर्कलमध्ये बांधण्यात आले. प्रत्येक बंधा-याची अंदाजपत्रकीय किंमतीच्या प्रती दयाव्या. H) सन २००५-२००७ या वर्षात पर्यायी वणीकरण योजनेअंतर्गत बिडींगच्या पूर्ण झालेल्या कामाचा संपूर्ण लेखी तपशिल खर्चासह दयावा. I) सन २००६ ते २००७ या आर्थिक वर्षात पाटा पांगरा सर्कलमध्ये सी.सी.टी.ची कामे करण्यात आली काय. केली असल्यास सदरच्या कामाचा संपूर्ण तपशिल दयावा."_सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून वन परिक्षेत्राधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय पारवा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक १.३.२००७ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये तत्कालीन वनपाल यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज त्यांनी ते माहिती अधिकारी नसल्यामुळे संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे पाठविला होता. परंतु त्या संदर्भातील पुरावा त्यांनी दाखल केला नाही. संबंधीत वनपरिक्षेत्राधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा माहितीचा अर्ज हा त्यांच्याकडे

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७०६/२००८**

**१) श्री सय्यद फिरोज सय्यद हाफीज**
**रा.समर्थवाडी, घाटी घाटंजी**
**ता. घाटंजी, जिल्हा यवतमाळ.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी**
**वनपरिक्षेत्र कार्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी तथा वनपाल**
**पाटा पांगरा सर्कल, पाटापांगरा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३०.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. शासकिय माहित अधिकारी म्हणून वनपाल पाटा पांगरा सर्कल कार्यालय हे हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकरी म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय, पारवा, तालुका घाटंजी हे हजर आहे. तसेच विद्यमान वन परिक्षेत्र अधिकारी, पारवा हेही हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून वनपाल, पाटा पांगरा सर्कल कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :- " A) नुकत्याच कटाई करण्यात आलेल्या श्री बाबुलाल जाधव रा. केळापूर तांडा पो. घोटी ता. घाटंजी यांचे शेतातील सागवानाची रहदारी पास कोणत्या तारखेला निर्गमित करण्यात आली होती. B) श्री बाबुलाल जाधव रा. केळापूर तांडा यांचे शेत कोणत्या वर्गामध्ये मोडल्या जाते. उदा. भोगवटा वर्ग १, भोगवटा वर्ग २ व अतिक्रमीत

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल नमूद केलेला आहे. व सदरची माहिती टपालाद्वारे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. परंतु सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी स्मरणपत्र दिनांक २५.११.२००६, ११.१२.२००६ व २०.१२.२००६ रोजी दिलेले आहे. परंतु तरी सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, दिनांक ४.६.२००८ रोजी त्यांना त्यांच्या दिनांक १०.१०.२००६ व २३.२.२००७ च्या अपीलाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, सदरची माहिती ही १५ महिन्यांनी विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज याची आवक नोंदवहीमध्ये नोंद आहे परंतु पुढे त्यावर कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्यावेळेस विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी नव्हते. परंतु संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून दोषी आढळून येतात व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांना वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २८.९.२००६ व १०.१०.२००६ च्या अर्जाचे संदर्भात विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून आलेले आहे, असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. त्याकरीता संबंधीत जन माहिती अधिकारी यांची अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करणे संयुक्तिक राहील. किंवा त्याकरीता अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये ज्या अधिका-यांनी किंवा कर्मचा-यांनी कार्यवाही केलेली नसेल त्यांची सुध्दा विभागीय चौकशी करणे

सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००६ ला माहितीचा अर्ज केल्यानंतर विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २५.११.२००६, ११.१२.२००६ व दिनांक २०.१२.२००६ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिलेले होते. व त्या स्मरणपत्रावरुन सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील वर नमूद केल्याप्रमाणे दाखल केले असे सांगितले.

अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयामध्ये अपीलकर्ता यांच्या अर्जाची आवक नोंदवहीमध्ये नोंद आहे परंतु, पुढील कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा आवक नोंदवहीमध्ये नोंद आहे, परंतु पुढील कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाल्यानंतर त्यांना दिनांक ४.६.२००८ उत्तर दिलेले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक ४.६.२००८ रोजी जरी उत्तर देण्यात आलेले असले तरी माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही, हे जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा मान्य केले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून ते अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

अपील क्रमांक १७००/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांचेकडे दिनांक २४ जून, १९९४ ते आजपर्यंत माहितीचा कालावधी नमूद करुन सहपत्र क्रमांक २ ते ६ मध्ये

अपीलकर्ता यांनी खर्चाची रक्कम भरली नसल्यामुळे सुनावणी घेतली नाही असे उत्तरवादी यांनी सांगितले. परंतु उपविभागीय अभियंता यांनी सदर माहिती ३ दिवसांत सादर करावी असे माहिती अधिकारी यांना आदेश दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर कोणतीही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्याचे वरीलप्रमाणे कारण जन माहिती अधिकारी यांनी दिले. आजही अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती व आयोगापूढे केलेला खुलासा याप्रमाणे ३२ पृष्ठांपेक्षा अधिक माहिती हवी असल्यास त्याकरीता रुपये २/- प्रति पृष्ठ याप्रमाणे खर्च भरणा करुन त्यांना माहिती उपलब्ध करुन घेता येईल. त्याकरीता त्यांनी ३४९ पृष्ठये असलेल्या नस्तीचे निरीक्षण करुन त्यातून त्यांना आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील व त्याकरीता त्यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये नस्तीची पाहाणी करावी व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्यावी व त्याबध्दलची पोच ही जन माहिती अधिकारी यांना द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक २६.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

माहिती दिली नसेल तर आक्षेप घेणारे पत्र दिले असावयास पाहिजे. व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद करावयाचे आणि ३० दिवसांत त्या कार्यालयाकडे जायचे नाही ही प्रवृत्ती प्रत्येक "व्यक्तीशः " लिहिणा-यांची दिसते. व्यक्तीशः माहिती घेणार याचा अर्थ अपीलकर्ता यांचे घरी जावून माहिती  देणे असा होत नाही. व ते अपेक्षित सुध्दा नाही. तर अपीलकर्ता यांनी ३० दिवसांचे आंत प्रत्यक्ष वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचकडे जावयास पाहिजे. अपीलकर्ता यांना अंदाजे रुपये ४००/- हा जर नियमबाहय वाटत असेल तर त्यांना त्याचवेळेस आज राज्य माहिती आयोगाकडे जो खुलासा केलेला आहे तो खुलासा जन माहिती अधिकारी यांचेकडे करता आला असता. तसेच माहितीचे पृष्ठये किती हे प्रत्यक्ष पाहाणी केल्याशिवाय कोणत्याही अधिका-यास किंवा अर्जदारास सांगता येणे शक्य नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी पाहाणी शिवाय निश्चित ३२ पाने आहेत असा खुलासा केलेला आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारकाचे सुध्दा अर्ज अपीलकर्ता हे स्वतः घेवून येतात व माहिती मागण्याचा प्रयत्न करतात. व तसेच त्यांनी श्री तुळशिराम देवाजी मेश्राम यांचा अर्ज दिलेला होता व त्या अर्जातून माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे.

४.	अपीलकर्ता यांचा रस्ता चांगला होणे हा जरी उद्येश असला तरी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता इतर ज्या युक्त्या केल्या जातात तशा त्या करावयाची आवश्यकता दिसत नाही. माहितीच्या करीता जो खर्च येईल तो भरणे आवश्यक असते. परंतु खर्च कळविल्यावर माहिती घेण्यासाठी येत नाहीत व त्यामुळे झालेल्या छायांकित प्रतीचा खर्च विनाकारण शासनाला सोसावा लागतो व त्यामुळे अति व्यापक प्रमाणात माहिती असल्यामुळे अंदाजे माहितीच्या खर्चाची रक्कम भरणे आवश्यक असते जेणेकरुन अर्जदार हे माहिती निश्चित उपलब्ध करुन घेईल. पृष्ठांची संख्या निश्चित झाल्यावर खर्चाचा भरणा कमी जास्त होऊ शकतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सुध्दा माहिती त्याचवेळेस उपलब्ध करुन घेता आली असती.

५.	प्रथम अपीलामध्ये सुनावणी झाली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु

खर्च किंवा खर्चाच्या संदर्भामध्ये कोणतीही बाब नमूद केलेली नाही.

२.	सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना जावक क्रमाक ३९१ प्रमाणे " आपण विषयांकित रस्त्याच्या कामाचे कामाबाबत माहिती मागितलेली आहे. त्या अनुषंगाने आपणांस माहिती पुरविण्यात येईल. करिता आपण हया कार्यालयांत संपूर्ण माहितीच्या कागदपत्राच्या झेरॅाक्स प्रती तीन बुकलेट मध्ये तयार करावयाचे असल्याने आपण अंदाजे रुपये ४००/- (रुपये चारशे फक्त) रोख रक्कम हया कार्यालयास ७ दिवसाच्या आंत जमा करावा त्यानंतर आपणास सदर कामाचे संपूर्ण दस्ताऐवज पूरविण्यात येईल. कृपया पत्राची पोच द्यावी. असे कळविलेले दिसून येते."

३.	सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले असून प्रथम अपीलाचे कारण नियमबाहय पैसे भरण्याचे आदेश केल्याबाबत असे दिलेले आहे. परंतु, त्यात कोणत्याही प्रकारचे विश्लेषण दिलेले नाही. प्रथम अपीलाची सुनावणी झाली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी नियमबाहय पैसे भरण्याचे आदेश असे कारण द्वितीय अपील दाखल करण्याकरीता सुध्दा दिलेले आहे. व त्याबाबत त्यांनी राज्य माहिती आयोगाकडील आज मागितलेल्या माहितीचे किती पृष्ठये होतील त्याचे विवरण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अंदाजे रुपये ४००/- होतील असे म्हटलेले आहे. त्याकरीता त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरच्या कामाच्या संदर्भातील अंदाजे एकुण ३४९ पृष्ठये आहेत. व त्यातील काही पृष्ठये आवश्यक असल्यास अपीलकर्ता यांना त्यांनी त्यांना सांगितले असते तर दिले असते. व त्याप्रमाणे खर्च कमी जास्त झाला असता. तसेच अपीलकर्ता यांना कार्यालयात येवून माहितीच्या संदर्भामध्ये माहिती द्यावी असे सांगितले असताना सुध्दा अपीलकर्ता हे कार्यालयात आले नाही. अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद केल्यावर ३० दिवसांत व्यक्तीशः माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधावयास पाहिजे व त्या ३० दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी

हरकत नाही. व त्याकरीता सुध्दा सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे सदर अपील निकाली काढण्यात येत असले तरी विभागीय आयुक्त, नागपूर यांनी त्यांच्या विभागामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींच्या संदर्भामध्ये प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे. व जे अधिकारी सदरच्या अधिनियमाच्या तरतूदींच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही त्यांच्या संदर्भामध्ये योग्य ती कार्यवाही करावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे विभागीय आयुक्त (महसुल), नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे त्यांच्या माहिती करीता व पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २५.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

अपील मेमोवर सौ. मिना तोमर असे दिलेले असून ते खोडतोड करुन पुन्हा लखनसिंह यांची अर्जावर सही केलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची माहिती दिसून येते. मात्र तहसिलदार कार्यालय, नागपूर (ग्रामीण) किंवा उपविभागीय अधिकारी, नागपूर यांना सदरच्या अधिनियमाची कोणत्याही प्रकारची माहिती दिसून येत नाही. माहितीचा अर्ज आल्यानंतर त्याबाबतची कशा प्रकारे प्रक्रिया करण्यात यावी, याबध्दलही काहीही माहिती दिसून येत नाही व ती सुध्दा मे, २००७ मध्ये ! त्यावेळेस सदरचा कायदा अंमलात येवून १८ महिने झाले होते. तरी सुध्दा कोणत्याही प्रकारे अधिनियमाच्या तरतूदी नुसार अर्जाची/अपीलाची प्रक्रिया केलेली दिसून येत नाही. तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांना आपण कशावर सही करतो याचीही त्यांना जाणिव दिसून येत नाही. उपविभागीय अधिकारी, नागपूर हे एकाच दिवशी दिनांक १२.६.२००७ रोजी अधिनियमाच्या नियम ८ मधील तरतूदीनुसार माहिती पुरविणे उचित वाटत नाही असे कळवितात व त्याच दिवशी दूस-या पत्राने कॅापींग विभागामधे रितसर अर्ज करुन फी भरावी व त्यानुसार कॉपींग विभागाकडून या कार्यालयाला रेकार्डची मागणी होताच पुरविण्यात येईल असे कळविले व दोनही पत्रामधील विसंगती त्यांचे लक्षात येत नाही किंवा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचे त्यांना आकलन नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्याकरीता जिल्हाधिकारी हे सुध्दा जबाबदार दिसून येतात. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीं बध्दल योग्य ती माहिती देणे किंवा प्रशिक्षण करणे ही सुध्दा जिल्हाधिकारी यांची जबाबदारी आहे. परंतु, त्याबाबत जिल्हाधिकारी यांचे कोणत्याही प्रकारचे योगदान आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे या प्रकरणातील सर्वच अधिका-यांची विभागीय चौकशी करणे क्रमप्राप्त ठरते. व त्याकरीता स्वतंत्रपणे विभागीय आयुक्त यांनी कार्यवाही करणे हे संयुक्तिक राहील.

५. अपीलकर्ता हे सुध्दा अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये हजर राहीलेले नाही व आयोगास योग्य ती माहिती देत नाहीत व त्या प्रकरणामध्ये लखनसिंह किंवा सौ.मिना तोमर हेही अर्ज करतात हा त्या माहितीच्या अधिकाराचा गैरवापर आहे, असाही निष्कर्ष काढावयास

पुरवावयाची माहिती करीता पुढील १५ दिवसांची मुदतवाढ करण्यात येत आहे." असे अपीलकर्ता यांना व सदरच्या पत्राची प्रतिलीपी तहसिलदार, नागपूर (ग्रामिण) यांना दिनांक २२.५.२००७ नुसार मागविण्यात आलेली माहिती उलट टपाली या कार्यालयाला सादर करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १२.६.२००७ रोजी रेकार्डचे अवलोकन केले असता सदरच्या रेकार्डची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ८ मधील तरतूदी नुसार प्रत्यक्ष आपणास पूरविणे उचित वाटत नाही. करीता आपले संदर्भिय अपील अर्ज या स्तरावर नस्तीबध्द करण्यात येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविलेले दिसते.

३. त्यानंतर सौ. मिना तोमर यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जाची प्रत दाखल केलेली दिसून येते. दिनांक ८.६.२००७ रोजी श्री वसंद दशरथ कांबळे यांनी तहसिलदार, नागपूर यांना नोटीसचा खुलासा दिलेला दिसतो. व त्यांची व्यक्तीगत माहिती असल्यामुळे उपलब्ध करुन देवू नये असे कळविलेले दिसते. दिनांक १६.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना श्री वसंद दशरथ कांबळे यांच्या बध्दलची माहिती श्री वसंत दशरथ कांबळे यांची संमती शिवाय पुरविता येणार नाही. आपला अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. नंतर दिनांक १.६.२००७ रोजी पुन्हा तहसिलदार यांनी उपविभागीय अधिकारी यांना श्री वसंत दशरथ कांबळे हे या कार्यालयात हजर होऊन सदर प्रकरणातील कोणतीही कागदपत्रे देण्यात येवू नये असे कळविलेले दिसते. मात्र दिनांक १२.६.२००७ रोजी पुन्हा उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २७.४.२००७ च्या अर्जानुसार मागणी केलेली माहिती तहसिलदार, नागपूर (ग्रामीण) यांचेकडून दिनांक १२.६.२००७ रोजी प्राप्त झालेली असून त्यातील आपण आपल्या अर्जात नमूद केलेली आवश्यक कागदपत्राची सत्यप्रती करीता रितसर तहसिलदार कार्यालय, नागपूर (शहर) येथील कॉपी विभागाला अर्ज करुन उचित फी भरावी व त्यानुसार कॅापी विभागाकडून या कार्यालयाला रेकार्डची मागणी होताच पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. सदरच्या प्रकरणात असे दिसून येते की, अपीलकर्ता श्री लखनसिंह हे सुध्दा कोणाच्या तरी सांगण्यावरुन माहिती मागवित आहे असे दिसते. कारण राज्य माहिती आयोगाकडील

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१२.२००६ रोजी उक्त अर्जातील माहिती तयार असून त्याच्या एकुण २५ प्रती आहेत. प्रत्येक प्रती शुल्क रुपये २/- असे एकुण शुल्क रुपये ४८ + रजिस्टर पोस्ट खर्च रुपये ३०/- असे एकुण रुपये ७८/- (अक्षरी रुपये अठयाहात्तर) इतके आहे. हे शुल्क आपण या कार्यालयाकडे त्वरीत भरणा करावे किंवा मनीऑर्डर करावी, असे कळविलले दिसून येते. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक २.१२.२००६ रोजी उक्त अर्जातील माहिती यासोबत सहपत्रित करण्यात येत आहे. सहपत्र १) जोडपत्र ब अपीलाचा अर्ज २) माहिती अधिकारी यांचेकउे पाठविलेले अर्ज ३) माहिती अधिकारी यांचे पत्र क्रं.२००६/७६०१ ४) पोस्टाच्या एम.ओ.ची झेरॉक्स व माहिती पाठविल्याच्या पाकीटाची झेरॉक्स ५) माहिती अधिकारी,अम याचे पत्र क्रं.२००६/९८९५ ६) माहिती अधिकारी,अम याचे पत्र क्रं.२००६/९८९६ ७) दिलेल्या राजपत्र पुस्तकाची एकंदर ८ पेजेस मुखपृष्ठांची झेरॉक्स व शासकिय पावतीची झेरॉक्स २०.१२.२००६ ला जमा केलेली. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये पत्र दिनांक ७.१२.२००६ ला प्राप्त णाले. त्याप्रमाणे एकुण ७८/- रुपये दिनाक ७.१२.२००६ ला मनीऑर्डर केला आहे. माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ११.१२.२००६ ला प्राप्त झाला. दिनांक ११.१२.२००६ सोमवारी प्राप्त झालेली मनीऑर्डरचे पैसे त्वरीत त्याच दिवशी शासकिय तिजोरीत जमा करावयास पाहीजे होते. परंतु तसे न करता ती ७८ रुपये रक्कम संबंधीत यांनी स्वखर्चासाठी वापरुन ती दिनांक २०.१२.२००६ ला १० दिवसानंतर शासकिय तिजोरीत जमा केली. झेरॉक्स जोडली आहे. तसेच ७८ रुपयाचे भरणा करण्याचे पत्र दिल्यावर जेव्हा माझे पैसे त्यांना प्राप्त होतील तेव्हा मला माहिती ही दिनांक १२.१२.२००६ ला द्यावयास पाहिजे होती. परंतु ७८ रुपयेचा भरणा करण्यासाठी पत्र व माहिती पाठविल्याचे पत्र हे एकाच तारखेत आहे व ती माहिती ही दिनांक २२.१२.२००६ पोस्ट केली जी मला दिांक २७.१२.२००६ ला प्राप्त झाली चार दिवसा उशीरा दिल्या गेली त्याबाबतचा पुरावा जोडला आहे. मी मागितलेली माहिती मला दिली गेलीच नाही. राजपत्राची झेरॉक्स प्रत मागितलेली नसून फक्त माहिती तयार असल्यास पत्र प्राप्त झाल्यापासून महिती किती दिवसांत संबंधीत रक्कम अदा करुन प्राप्त करुन घेतली पाहिजे अन्यथा ती दप्तरी जमा केली जाईल यासंबंधी माहितीची मागणी केली होती. व

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६७९/२००८**

**१) श्री बलवंत सदाशिव गाडगे**
**औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोर्शी**
**मु.पो.ता.मोर्शी, जिल्हा अमरावती.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा निरीक्षक**
**व्यवसाय शिक्षण प प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३. जिल्हा अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (क.)(तां.)**
**व्यवसाय शिक्षण प प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**मोर्शी रोड, अमरावती-४४४६०३. जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २३.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ (प्राप्त २४.११.२००६) च्या अर्जाचे अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती तयार असल्याचे माहिती मागविणा-यास माहिती तयार असल्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून माहिती किती दिवसाच्या आंत संबंधित रकम अदा करुन प्राप्त करुन घेतली पाहिजे. अन्यथा ती दप्तरी जमा होइल. हया संबंधीत माहिती अधिकार २००५ अधिनियमाप्रमाणे नियमाच्या माहिती अधिकारा अधिनियम २००५ चे रापपत्र पुस्तकातील झेरॉक्स प्रत मला देण्यात यावी. किंवा प्रशासकिय परिपत्रकात जर प्रसिध्द झाले असेल त्याचे साक्षांकित झेरॉक्स प्रत मला देण्यात यावी. अशी माहिती शासकिय माहिती अधिकारी तथा उप संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचेकडे मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी जी वस्तुस्थिती नमूद केलेली आहे त्यावरुन सुध्दा पारडीकर कुटूंब त्या ठिकाणी राहात आहे असे दिसून येते. व त्याबध्दलची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

असे असले तरी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांचे आजोबाचे जे घर होते ते दाखवलेले असल्यामुळे त्या घराच्या संदर्भामध्ये ग्राम पंचायतच्या अभिलेख्यामध्ये नमूना नंबर ८ मध्ये ज्या नोंदी असतील त्या नोंदीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी येरळ गांवातील जे त्यांच्या आजोबाचे घर आहे असे दाखविले होते त्या घराच्या संदर्भामध्ये ग्राम पंचातच्या अभिलेख्यामध्ये अर्ज केला त्या तारखेस नमूना नंबर ८ मध्ये ज्या नोंदी असतील त्या नमूना नंबर ८ च्या ज्या वर्षापासून अभिलेखे उपलब्ध असतील त्यातील प्रत्येक वर्षीच्या नमूना नंबर ८ च्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता गट ग्रामपंचायत येरड येथे जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष जावून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी मौजा येरळ तालुका चांदूर रेल्वे, जिहा अमरावती, परगना नेर, सबरजिस्ट्रार चांदूर रेल्वे नंबर बंदोबस्त २८५( इंडेक्स नंबर २) ची उपलब्ध छायांकित प्रत अपीलकर्ता यांना द्यावी व त्याबध्दलची अपीलकर्ता यांनी पोच द्यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २१.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती चांदूर रेल्वे यांचेकडे प्रथम अपीली दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी घेण्यात येवून दिनांक ३१.१.२००७ रोजी अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येते. त्याकरीता अपीलार्थी यांनी स्वत: येरड येथे येवून स्वत:चे घर दाखवावे अशी मागणी ही जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीस केलेली दिसते. त्याप्रमाणे घर दाखवून दिल्यावर अपीलकर्ता यांना दिनांक ५.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.११.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विहित मुदतीत कां उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्या दिवशी अर्ज दिला त्या दिवशी स्वत: अपीलकर्ता व त्यांचे वडील हजर होते. परंतु ग्राम पंचायतमध्ये १९६०, १९६१, १९६२ चे रेकार्ड उपलब्ध नाही व याबाबतची तपासणी करुन अपीलकर्ता व त्यांचे वडील यांनी खात्री करुन घेतलेली आहे.. त्यानंतर माहिती तयार करण्यात येवून दिनांक २२.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना युपीसीने पत्राद्वारे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या पत्राची छायांकित प्रत माहिती अधिकारी यांनी दाखल केलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरचे पत्र मिळाले नाही. दिनांक २०.११.२००६ (२२.११.२००६) च्या पत्रामध्ये दिनांक ८.११.२००६ रोजीची वस्तुस्थिती नमूद केलेली असून सन १९८४ ते १९९९ च्या रेकार्डची पाहाणी केली असता त्यामध्ये काशीराव त्र्यंबकराव देशमुख यांची ग्रामपंचायत रेकार्डवर तशी कोणतीही नोंद आढळून आली नाही. तसेच नमूना नंबर ८ ची ग्राम पंचायत रेकार्डची पाहाणी केली असता सदर्हु नावाची कोणतीही नोंद पाहावयास मिळाली नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती पुरविणे शक्य नाही, असे कळविलेले दिसते.

प्रथम अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी घर दाखवून द्यावे असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विचारलेले दिसते. मात्र प्रथम

झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.४.२००८ रोजी तसेच २४ मार्च, २००८ रोजीचे पत्राप्रामाणे पे रोल व्यवहाराचे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहाण्याकरीता आपण दिनांक ७.४.२००८ रोजी मुख्य व्यवस्थापक यांचे कार्यालय उर्जाभवन येथे कार्यालयीन वेळेत येवून बघू शकता असे अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी कळविलेले दिसून येते. त्यापूर्वी अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक २४.३.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक यांना पत्राद्वारे कागदपत्रे दाखविण्याकरीत व्यवस्था व्हावी अशीही विचारणा केलेली दिसून येते. व यावरुन अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. कागदपत्रांच्या पाहाणीकरीता सुध्दा कळविण्यात आलेले आहेत. व त्यामुळे माहिती जाणूनबुजून लपवून ठेवण्याचा सुध्दा उद्येश आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे दोषी धरता येत नाही. अपीलकर्ता यांनी "माहिती" या संज्ञेची व्याख्या लक्षात घेतली असती तर त्यांना त्रास झाला नसता. अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे कागदपत्रे असावयास पाहिजे असे जे त्यांना वाटते त्यामुळे त्यांना त्रास झाला आहे असे दिसून येते त्याकरीता त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका-याकडे तक्रार करुन कागदपत्रे ठेवण्यासंदर्भात सूचना करणे हा एक मार्ग आहे. व तशा प्रकारे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता योंग्य त्या सक्षम अधिका-याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१)अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे व त्यांच्या पूर्वीच्या सर्व अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा सुध्दा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक २१.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

शिवाय या लाखो रुपयावर इनकम टॅक्स भरला गेलेला नाही. त्यामुळे पांढरपेशा सशिक्षित सुसंस्कृत कर्मचा-याची इन्कम टॅक्स न भरणे हे माझे दु:ख व वेदना आहे. शिवाय या प्रकरणत मला बराच त्रास दिलेला आहे.त्यामुळे मी अपील केलेले आहे.

अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक यांनी खुलासा दाखल करताना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच अपीलकर्ता यांना आतापर्यंत ७ अर्जाच्या माध्यमातून दिनांक २०.१०.२००६, २६.१२.२००६, ८.३.२००७, ९.३.२००७, ९.४.२००७, ९.४.२००७, १७.१२.२००७ प्रमाणे अनुक्रमांक २३.११.२००६, ३.२.२००७, ४.४.२००७, ५.४.२००७, ५.५.२००७, ५.५.२००७, १६.१.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी आतापर्यंत ६ अपीले दाखल केलेली दिसून येते. व त्या ६ अपलाचा निर्णय सुध्दा दिलेला आहे. तसेच आतापर्यंत अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीचे कागदपत्रे सुध्दा आयोगाच्या निदर्शनास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आणले.

अपीलकर्ता यांनी सन ९२ पासून माहिती मागितली त्याबध्दल प्रथम अपीलीय अधिकारी तसेच माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, मागिल माहिती उपलब्ध नाही व तेच अपीलकर्ता यांनी पूर्वीच्या अर्जामध्ये कळविलेले आहे. इन्कम टॅक्स संदभामध्ये अर्थातच सदरचे पेमेंट हे मानधन असल्यामुळे व कमीशन असल्यामुळे इन्कम टॅक्स त्यांच्याकडून घेतलेले नाही असे त्यांनी सांगितले. इन्कम टॅक्सच्या संदर्भामध्ये वैयक्तिक व्यक्तीने इन्कम टॅक्स भरले आहे किंवा नाही हे सांगता येत नाही.

आर.डी.व्यवहार पारदर्शक आहे काय याबध्दल पादरर्शक आहे असे माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. अर्थातच याबाबत जी कागदपत्रे उपलब्ध होती त्यातून असा निष्कर्ष अपीलकर्ता यांनी काढावयाचा आहे. त्यामुळे हा प्रश्न गैरलागू आहे.

ज्यांना ज्यांना मानधन दिलेले आहे त्याबध्दल वेतन पत्रके आहे काय किंवा त्यांचेकडून कॅश व्हाऊचर आहे काय याबध्दल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी व माहिती अधिकारी यांनी ते उपलब्ध नाही असे सांगितले. व जी माहिती आतापर्यंत उपलब्ध आहे ती वेळोवेळी अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली आहे असे त्यांनी सांगितले. त्याबाबतही अपीलकर्ता यांचे समाधान न

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.४.२००७ रोजी १) अल्प बचत गट बघणारे २५ कर्मचारी यांना अल्पबचत व्यवहाराबाबत चंमऔविकेंद्रातर्फे सन २००४ ते २००६ पर्यंत दिलेला मेहनताना खालीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

| अ.क्रं. | वर्ष | वार्षिक मेहनताना |
|---|---|---|
| १ | २००४ | रु. १,०२,०००,०० |
| २ | २००५ | रु. १,१४,०००,०० |
| ३. | २००६ | रु. १,२६,०००,०० |

२) ही माहिती व्यक्त्ीगत स्वरुपाची असल्यामुळे या कार्यालयात उपलब्ध नाही.

३) ही माहिती व्यक्तीगत स्वरुपाची असल्यामुळे या कार्यालयात उपलब्ध नाही.

४) आर.डी.व्यवहार पारदर्शक आहे.

असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. वरील निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात ५ मे, २००७ रोजी आपण मागितलेली मुद्येसूद माहिती या कार्यालयाचे पत्र क्रमांक चंमऔविके/तांत्रिक/महितीअधिकारी/४०३१, दिनांक ४.४.२००७ अन्वये माहिती अधिकारी यांनी पुरविलेली आहे याची नोंद घ्यावी असे अपीलीय अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलीकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खुलासा सादर केलेला आहे. व त्या खुलासा मध्ये सीटीपीएस पीआरजीएस सहित २५ माणसे कर्मचारी कार्यरत आहेत. यांना आर.डी. कमीशन स्वरुपात लाखो रुपये दरसाल दिले जातात याबध्दलचा रेकार्ड माहिती अधिकारात मागितला तो दिलेला नाही. जी माहिती पुरविली ती अपूर्ण आहे. ३ वर्षापूर्वीचा रेकार्ड उपलब्ध नसल्याचे सांगतात जेव्हा की कॅश व्हाऊचर गहाळ करता येत नाहीत

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक१६६५ /२००८**

**१) श्री श्रीराम लक्ष्मण पान्हरेकर**
**१/२ उर्जानगर, चंद्रपूरर्४४२४०४**
**ता.जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**चंद्रपूर महाराष्ट्र औष्णिक विज केंद्र,**
**म.रा.विज निर्मीती कं.मर्या.उर्जाभवन, उर्जानगर, चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता**
**चंद्रपूर महाराष्ट्र औष्णिक विज केंद्र,**
**म.रा.विज निर्मीती कं.मर्या.उर्जाभवन, उर्जानगर, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी, महाराष्ट्र आष्णीक वीज केंद्र, चंद्रपूर यांचेकडे अल्प बचत गट आर्थिक व्यवहार

१) श्री सुरेश रेवतकर, श्री उईके, श्री रामटेके, श्री दोडके यांना अल्पबचत व्यवहाराबाबत आजवर ९२ पासून २००७ पर्यंत दरवर्षी किती मेहनताना दिला गेला.

२) या पैशावर Income Tax भरलेला आहे काय

३) इनकम ॲक्स भरल्याची प्रत्येक व्यक्तीची पावतीची झेरॉक्स

४) आर.डी.व्यवहार पारदर्शक आहे काय.

मागितलेली माहिती टपालाद्वारे घेणार व खर्च दिला जाईल असे नमूद केलेले दिसून येते.

आस्थापना शाखेचे संबंधीत इनचार्ज विरुध्द कोणत्या प्रकारची कार्यवाही केली असे त्यांना विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता इतर अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य घेता येते. व जे अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल त्यांना अधिनियमाच्या कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. त्याप्रमाणे आस्थापना शाखेचे इनचार्ज ज्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला आहे ते जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व त्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे हे आवश्यक ठरते. जर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करणे आवश्यक ठरते.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपील हे अपीलकता र्यांनी दूस-या डिव्हीजनला दाखल केले होते असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा कोणत्याही प्रकारे निर्णय दिलेला दिसून येत नाही. वास्तविक प्रथम अपील हे ज्या माहिती अधिका-याकडे अर्ज दाखल केलेला असेत त्याच जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ असतील त्यांच्याकडे दाखल करावयास पाहिजे व त्यामुळे प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्याबाबतचा विचार करता येत नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी विलंब झालेला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मजूर करण्यास पात्र आहे.

<u>**आदेश**</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता याना त्यांच्या दिनांक २.२.२००७ च्या अर्जानुसार माहिती विनामुल्या उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्या दिनांक २.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विलंब झालेला असल्यामुळे ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचेकडून विलंब झालेला आहे त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून

तर ती खास दूतामार्फत साध्या टपालाने अंडर सर्टिफिकेट पंजीबध्द डाक किंवा स्पीडपोस्टाने पाठविण्यात आली आहे, याची माहिती व पाठविण्यात आलेल्या पत्राच्या झेरॉक्स मला पाहिजे आहेत. तसेच पोहच पावत्याच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात, ही विनंती."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.३.२००७ रोजी दिनांक १५.३.२००७ रोजी माहितीच्या करीता शुल्क भरावे असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरची विहित मुदतीत महिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दिनांक १२.३.२००७ रोजी प्रथम अपील व्यवस्थापकिय संचालक, वन विकास महामंडळ मर्या. कडबी चौक, कामठी रोड नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे अर्ज दाखल केल्यानंतर त्या अर्जाच्या निर्णयाविरुध्द अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपील दाखल करावयाचे आहे व प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाचे असते. त्यामुळे दोन माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये एक राज्य माहिती आयोगाकडे अपील किंवा दोन प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये एकच अपील हे दाखल करता येत नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांच्या देनही अर्जांचा विचार करण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक २.२.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने पत्र दिलेले आहे त्याबध्दल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ज्या आस्थापना शाखेकडे उपलब्ध होती त्या आस्थापना शाखेने माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले होते व आस्थापना शाखेने सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन द्यावी लागली. अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २.२.२००७ रोजी आल्यानंतर दिनांक ९.२.२००७ रोजी आस्थापना शाखा इनचार्ज यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले. नंतर पुन्हा दनांक ७.३.२००७ रोजी स्मरणपत्र दिले, असे त्यांचे म्हणणे आहे. व आस्थापना शाखेने कळविल्यानंतर अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. आस्थापना शाखेमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्यामुळे

प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १८.१०.२००६ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १४.९.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती ३० दिवसाच्या आंत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला दिसून येत नाही व त्याकरीता द्वितीय अपीलाचा विचार करता येत नाही.

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००७ रोजी पुन्हा विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वन प्रकल्प विभाग, यांचेकडे खालीलप्रमाणे कळविल्याचे दिसून येते.

| माहितीचा विषय | माहिती ज्याच्याशी संबंधीत हवी असेल तो कालावधी | आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वत: | जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे. |
|---|---|---|---|---|
| प्राणहिता वन प्रकल्प विभागा आलापल्ली यांचेकडे थकित असलेले अर्जदाराचे आर्थिक हक्क कोणत्या कारणाने अडवून किंवा दाबून ठेवण्यात आले आहे. कळविणे | १)दि.१.४.०५ पासून दि. २.२.०६<br>२)दि.१.९.०५ पासून दि. ३१.१.०६<br>३)दि.२.२.०५ पासून दि. ८.६.०६<br>४)दि.१.५.०६ पासून देय<br>५)दि.९.६.०६ पासून देय | स्थायी प्रवासभत्ता बिल व.र.मंजूर करणे व रजेचे वेतन वार्षिक वेतन वाढ सेवापुस्तक अद्यावत नोंदीसह प.चा.वप्रवि ला पाठविणे.पोस्ट तारण विरहीत करुन पाठविणे.पश्चिम चांदा विभागाला पाठविणे. उत्पन्नाचा दाखल | माहिती टपालाने मिळणे आवश्यक | पश्चिम चांदा वन प्रकल्प विभागा मार्फत किंवा पंजीबध्द डाकेने. |
| | | | | |

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " मी आपले हाताखाली काम करणारा सर्वसामान्य कर्मचारी असून आपले मार्फतीने वरील सर्व बिल व माझा रजेचा अर्ज योग्य मार्गे आपले सेवेत सादर केले आहे. माझेकडे पोहच आहे. वरील सर्व टपाल प्रणहिता वनप्रकल्प विभाग, आलापल्लीला आपले कार्यालयामार्फत पाठविण्यात आली किंवा नाह. पाठविण्यात आली असेल

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६६२/२००८**

**१) श्री हरिदास विजन गेडाम,**
**मु.पो.नवरगांव, ता.सिंदेवाही, जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक**
**दक्षिण चंद्रपूर प्रदेश (F.D.C.M.) चंद्रपूर,**
**मुल रोड, चंद्रपूर.**
**३) व्यवस्थापकिय संचालक, वनविकास महामंडळ मर्या.**
**कडबी चौक, कामठी रोड, नागपूर.**

**४) जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक,**
**प्राणहिता वन प्रकल्प विभाग, आलापल्ली, जि.गडचिरोली.**
**५) जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक,**
**पश्चिम चांदा वनप्रकल्प विभाग, स्टेडीयम रोड, चंद्रपूर**
**(F.D.C.M.), जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.६.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी विभागीय व्यवस्थापक, प्राणहिता वन प्रकल्प, आलापल्ली यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून रजिस्टर पोस्टाने ती पाठविण्यात आल्याचे दिसून येते. व सदरची माहिती अपीलकर्ता याना दिनांक ४.१०.२००४ रोजी उपलब्ध झाल्यामुळे ती विलंबाने उपलब्ध झाली असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे दिनांक २८.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या

नव्हते व त्यामुळे त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ती माहिती चुकीची आहे. अर्थात चुकीची माहिती याचा अर्थ असा की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या पेक्षा वेगळी माहिती त्यांनी उपलब्धकरुन देणे असा होतो. अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००६ चे पत्रावर काय कार्यवाही केली याबध्दलची सविस्तर माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्या दृष्टीने अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर दिसून येते. तसेच उपलब्ध झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही असे आढळून येत असेल तर त्यांनी स्वतंत्रपणे पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज दाखल करणे हा मार्ग राहातो. परंतु त्याही बाबत अपूर्ण माहिती दिली असा निष्कर्ष वर काढलेला असल्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. यावरुन तत्कालीन माहिती अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विलंब केलेला आहे व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात हा वर निष्कर्ष काढलेलाच आहे. अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे त्यांच्या विरुध्द शास्ती लादावयाची झाल्यास त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे बंधनकारक आहे. परंतु संबंधीत तत्कालीन माहिती अधिकारी रजेवर गेलेले असल्यामुळे आज ते आयोगापूढे हजर होऊ शकत नाही व त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकूण घेता येत नाही. व त्याकरीता त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस ही करणे योग्य राहील. तसेच अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१.२००६ च्या अर्जाप्रमाणे संपुर्ण कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे योग्य राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.५.२००६ च्या अर्जाप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी (जिल्हा परिषद कार्यालयातील) यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००६ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये झ ाालेल्या कार्यवाहीबध्दल संबंधीत माहितीच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे व ती अपीलकर्ता यांना दिनांक १.९.२००६ रोजी प्राप्त झाली अशी त्यावर त्यांनी नोंद केलेली आहे. त्यानंतर दिनांक ५.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदूरा यांनी त्यांचे दिनांक २९.५.२००६ च्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील मेमोसोबत राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे दिनांक ४.१०.२००६ रोजी अपील रजिस्टर पोस्टाद्वारे दाखल केले होते. ते त्यांना मिळाले नाही असे त्यांनी नमूद केले आहे. परंतु सदरचे अपील हे नागपूर येथील कार्यालयामध्ये वर्ग झालेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी नंतर पुन्हा हे अपील दाखल केले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००६ रोजी माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी दिनांक १६.१.२००६ रोजी धानोरा (वि) ग्राम पंचायत विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे तक्रार अर्ज दिलेला होता व त्या अर्जावरील कार्यवाही अहवाल त्यांनी मागितला होता. ज्याअर्थी, मुळ तक्रार अर्ज हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेला होता त्याअर्थी त्याच कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१.२००६ च्या अर्जावर काय कार्यवाही झाली ही माहिती उपलब्ध करुन दयावयास पाहिजे होती. परंतु तसे न करता सदरचा अर्ज हा गट विकास अधिकारी यांचेकडे वर्ग केलेला दिसून येतो. सदरचा अर्ज वर्ग करताना सुध्दा दिनांक २३.८.२००६ रोजी वर्ग केलेला दिसून येतो व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दोषी आढळून येतात. व त्यानंतर दिनांक ५.९.२००६ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदूरा यांनी अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. ती माहिती सुध्दा अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. सदरच्या माहितीमध्ये आपले दिनांक १६.१.२००६ च्या पत्रानुसार पंचायत समिती, नांदूराचे पत्र दिनांक २१.२.२००६ अन्वये बांधकाम व त्यावरील खर्च आपणास कळविण्यात आलेला आहे असे जरी कळविण्यात आले असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे बांधकाम हे करण्यात आलेले

प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांना उपस्थित राहाण्याकरीता बोलाविण्याची तरतूद नसल्यामुळे अपीलकर्ता यांना मानसिक त्रास व खर्च झालेला आहे असे कारण दिलेले आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

४. माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज सहाय्यक माहिती अधिकारी तांत्रिक शाखा-२ कडे दिनांक ६.११.२००६ ला माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीसाठी देण्यात आला. तत्कालीन माहिती अधिकारी यांचेकडे या नियुक्ती संदर्भातील सर्व रेकार्ड हा मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष निवड समिती यांचे समोर सिल केलेला असल्याने व सिल केलेल्या रेकार्डवर एकुण ५ अधिका-यांच्या सहया असल्याने सदर अधिका-यांकडे संपर्क साधून त्यांच्याकडून सहया प्राप्त करुन रेकार्ड काढण्यात आला. त्यामुळे त्यांना वेळेत माहिती देता आली नाही. रेकार्डला लावण्यात आलेले सिल काढताच अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. यामध्ये टाळाटाळ करण्यात आली नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळै अंतिम निर्णय दिलेला नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

५. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केला आहे तो जर खरा असेल तर तसे अपीलकर्ता यांना ३० दिवसांचे आंत कळवावयास पाहिजे होते. तसे ते केलेले दिसून येत नाही. तसेच माहिती अपूर्ण आहे व त्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा विहित मुदतीत सुनावणी घेतलेली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी त्यांच्या प्रथम अपील मेमोमध्ये विलंबाने माहिती दिली त्याबध्दल रुपये १७,०००/- शास्ती करावी अशी विनंती केलेली आहे. परंतु, तत्कालीन माहिती अधिकारी हे आता माहिती अधिकारी नसून अमरावती येथे त्यांची बदली झालेली आहे. अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादावयाची असल्यास त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे आवश्यक आहे. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन माहिती अधिकारी हे हजर नसल्यामुळे व त्यांची बदली झाली असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेता येत नाही. व त्यामुळे त्यांचेवर अधिनियमाचे कलम २०(१)

४. संबंधीत जागेसाठी किती उमेदवारांची निवड जिल्हयातून करण्यात आली. प्रथम क्रमांकाच्या उमेदवाराचे लेखी व तोंडी परीक्षेचे गुण किती. व शेवटच्या उमेदवाराचे लेखी व तोंडी परीक्षेचे गुण किती. संबंधीतांच्या जन्मतारखा व वय किती.

५. निवड झालेल्या उमेदवारांची नांवे देण्यात यावी व लेखी व तोंडी गुण देण्यात यावेत.

६. प्रतिक्षा यादीवर किती उमेदवार आहेत. त्यांची नावे लेखी तोंडी परीक्षेचे गुणासह माहिती द्यावी.

७. प्रतिक्षा यादीची कालमर्यादा कोठपर्यंत आहे.

८. पदोन्नती किंवा सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीने जागेवर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची निवउ केली जाते काय. दिनांक ९ जुलै २००६ पासून जिल्हयातील किती लोक पदोन्नत किंवा निवृत्त झाले त्यांची एकुण संख्या.

९. प्रतिक्षा कालावधीत उपलब्ध जागेवर प्रतिक्ष यादीतील उमेदवारांची निवड केली जाईल काय."

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा विहित मुदतीत दिलेला नसून दिनांक १२.१.२००७ रोजी पैसे भरुन माहिती घेवून जाण्यासाठी सूचित केले होते. दिनांक १५.१.२००७ रोजी माहिती देण्यात आली. मात्र पैसे कळविले असले तरी घेतलेले नाहीत. माहिती दिल्यामुळे व त्यांचे समाधान झाल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नव्हता असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु, अपीलकर्ता यांनी त्यांचे समाधान झालेले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपील मध्ये माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली, तसेच निवड झालेल्या उमेदवारांचे लेखी गुण दिले होते, तोंडी गुण व त्यांची जन्म तारीख दिलेली नाही. दिनांक १२.१.२००७ रोजी म्हणजे मुदतीच्या नंतर रुपये २५ शुल्क भरण्याचे आदेश दिले. दोन पेजेस साठी २५/- रुपये हे अवाजवी आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.१.२००७ रोजी आपणास दिनांक २५.१.२००७ प्रमाणे द्यावयास पाहिजे तो दिला नाही.

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६५७/२००८**

**१) श्री वसंतराव पुंडलीकराव देशमुख**
**वार्ड .नं.११, माळीखेल, जळगांव (जा.)**
**ता. जळगांव जामोद, जि. बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००६ रोजी सचिव, जिल्हा निवड समिती तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे जिल्हा निवड समितीद्वारे पशुधन पर्यवेक्षक निवडीबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " नोकरीसंबंधी.

२. २४ जून, २००६ चे जाहिरातीनुसार पशुधन पर्यवेक्षकांची लेखी परीक्षा ९ जुलै, २००६ रोजी झाली त्याप्रकरणी खालील माहिती देण्यात यावी.

३. संबंधीत जागेसाठी किती उमेदवाराची गरज होती त्यातील खुल्या वर्गासाठी किती जागा उपलब्ध होत्या.

निर्णयामध्ये मौजा हजारी पहाड येथील भूमापन क्रमांक ५० व ५१ या मिळकतीच्या बाबतची माहिती देण्यास नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३ तयार आहे तेव्हा अपीलार्थी यांनी त्यांचेकडे विहित फी भरणा करुन नक्कल प्राप्त करुन घ्यावी, असा निर्णय दिलेला असून अपील निकाली काढण्यात आले. दिनांक २०.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना नकाशाची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलामध्ये अपूरी माहिती, पहिले अपील संयुक्त कारणाशिवाय निकाली काढल्याने, आखिव पत्रिका व नकाशा करीता ७५/- रुपये अवाजवी फी आकारणे तसेच दिलेल्या आखिव पत्रिकेत संपुर्ण कॅालमप्रमाणे माहिती पाहिजे व सोबत इंग्रजी निवेदन दिलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अपूरी माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी असे सांगितले की, आखिव पत्रिकेत जे इतर कॅालम आहे त्यात कोणत्या माहिती धारकाच्या संदर्भात सुध्दा नमूद केलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की जोपर्यंत शेत जमीन आहे तोपर्यंत त्या शेत जमीनीची माहिती ही ७/१२ वर उपलब्ध असते. आखिव पत्रिका ही शहर भूमापन कार्यालयाकडे असते व जोपर्यंत शेत जमीन अकृषक होत नाही तोपर्यंत आखिव पत्रिकेवर धारकाची त्याबध्दलची नोंद होत नाही व त्यामुळे आखिव पत्रिकेवरील इतर रकाने जे आहे त्यात कोणत्याही नोंदी नाही. त्यामुळे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. पहिले अपील संयुक्त कारणाशिवाय निकाली काढल्याने याबध्दल अर्थातच अपीलकर्ता हे दिनांक ९.३.२००७ रोजी सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे निकाली जर काढले असेल तर भूमापन क्रमांक ५० व ५१ या संदर्भामध्ये नगर भूमापन अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे व त्याकरीता फी भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिला आहे. कार्यालयाकडून ज्यावेळेस अर्जदारास किंवा अपीलकर्त्यास नोटीस निर्गमित करण्यात येते तर ती नोटीस अपीलकर्ता किंवा अर्जदारास मिळाली किंवा नाही याबध्दलची निश्चित माहिती जर मिळालेली नसेल तर अर्थातच अपील हे एकतर्फी निकाली काढता येते. तसे ते जर एकतर्फी निकाली काढले असेल तर त्यात वर नमूद केल्याप्रमाणे निर्णय दिलेला आहे. व त्यामुळे

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.१.२००७ रोजी नगर भूमापन अधिकारी क्रं.३ यांनी मौजा हजारी पहाड येथील नगर भूमापन क्रमांक ५० व ५१ चे आखिव पत्रिका नकाशा मागणी केली आहे. याद्वारे आपणास पाठविण्यात येत आहे. या कार्यालयात उपलब्ध आहे त्या स्थितीमध्ये आपणास अभिलेख पुरविण्यात येत असल्याने आपल्या मागणीप्रमाणे आखिव पत्रिकेतील इतर रकान्यांची माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक २०.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी आक्षेप घेणारे पत्र भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांचेकडे देण्यात आलेले दिसते. त्यानंतर अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २०.२.२००७ रोजी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. उपजिल्हाधिकारी, नागपूर हे प्रथम अपीलीय अधिकारी नसल्यामुळे अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक २२.२.२००७ रोजी अधीक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांचेकडे अपीलकर्ता यांचे अपील हे हस्तांतर केलेले दिसून येते. त्यावर दिनांक ८.२.२००७ रोजी मौजा हजारी पहाड येथ्ील नगर भूमापन क्रमांक ५० व ५१ चा नकाशाची प्रत पाहिजे आहे त्याकरीता आपणास स्वतंत्र अर्ज करुन त्याची नक्कल फी रुपये प्रत्येकी २५/- प्रमाणे २ नकाशाची फी एकुण रक्कम रुपये ५०/- चा भरणा करावयाचा आहे त्यानंतरच आपणास या कार्यालयाकडून नकाशा पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र दिनांक २२.२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना मिळालेले दिसून येते. दिनांक २.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी रुपये ५०/- चा भरणा केलेला दिसून येतो. दिनांक २०.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी स्मरणपत्र दिले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अधीक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांनी दिनांक २.३.२००७ रोजी दिनांक ९.३.२००७ रोजी अपीलाच्या सुनावणीची तारीख निश्चित केलेली आहे,असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसते. परंतु, अपीलकर्ता यांना सदरची प्रत दिनांक १७.३.२००७ रोजी मिळाली असे त्यांनी नमूद केलेले दिसून येते. दिनांक १९.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००३ च्या सुनावणीसाठी हजर राहू शकलो नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी दिनांक १२.३.२००७ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. व सदरच्या प्रथम अपीलाच्या

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६५६/२००८**

**१) श्री प्रभाकर बलराम जाधव**
**प्लॅाट नं.५, दत्त कॅालनी, गोरक्षण रोड**
**पो.गाधीनगर, अकोला-४४४००४.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक**
**भूमी अभिलेख, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी क्रं.३,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. तसेच रुपये २५/- चा चेक सुध्दा अर्जासोबत जोडलेला दिसून येतो.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : आमचे दि. १२.२.९८ चे अर्जानुसार आपले कडून १८.२.९८ रोजी देण्यात आलेले भूमापन क्रं.५० व ५१ (शिट नं.१९२ व १९३) मौ.हजारी पहाड येथील भूखंडाचे मालकी विषयी माहिती पाहिजे. आखीव पत्रिकेत भूमिधाधिकार, धारक, सन हक्काचे मुळ, पटटेदार, इतर भार इ. देण्यात आले नाही. ते कृपया देण्यात यावे, ही नम्र विनंती. नोट शुल्कापोटी २५ रु.चा क्रास चेक क्रं. ७९८-१५२/५.१.०७ SBI Br.Ako चा सोबत पाठवित आहे."

भाषेतील प्रत ही उपलब्ध करुन द्यावी म्हणून जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना आदेश देण्यात आले होते. परंतु त्याप्रमाणे त्यांनी इंग्रजी भाषेतील प्रत उपलब्ध करुन दिली असून त्यामध्ये Every Certifief copy of the entry in the register of property maintain by a survey officer under section १२८ असे दिलेले आहे. व त्यामुळे An entry हा शब्द असल्यामुळे प्रत्येक नोंदीकरीता रुपये १५ आकारले जातात असे अधीक्षक भूमी अभिलेख यांनी निदर्शनास आणले. अर्थातच अपीलकर्ता यांना जर बाब मान्य नसल्यास त्यांनी शासनाकडे स्पष्टीकरण किंवा सुधारणा करण्याकरीता निवेदन देणे क्रमप्राप्त ठरेल. परंतु, उत्तरवादी यांनी जी कार्यपध्दती अपीलकर्ता यांना कळविलेली आहे ती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.२.२००६ च्या अर्जाप्रमाणे तसेच दिनांक १४.४.२००६ च्या प्रथम अपीलाचे प्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १८.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

अर्जावर लावण्याची कोठेही शासनाची तरतूद नाही. परंतू आपल्या कार्यालयात प्रत्येक अर्जावर ५/- रुपयाचे तिकिट लावलयाशिवाय अर्ज स्विकारण्यात येत नाही. याबाबत माहिती पाठविण्यात यावी.

७) मा.जमाबंदी आयुक्त यांचे परिपत्रक क्रं.एस.व्ही.सी.आर.१०८२/ना.भू.२/९१ दि.१७.६.१९९९ प्रमाणे मृत इसमाचे मृत्यू प्रमाणपत्र लावण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. मूळ प्रतिज्ञापत्राची प्रत लावण्याबाबत कोणत्याही शासन परिपत्रकात उल्लेख नाही. तरी मुळ प्रतिज्ञापत्र लावण्यात येण्याचा आग्रह का. याबाबत माहिती पाठविण्यात यावी.

८) नमूना १२ नियम १७(१) च्या नोटीसच्या नमून्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही असे कळविलेले आहे. परंतू पूर्वीच्या नमून्यात अर्जदार गैरहजर राहील्यास नोंद प्रमाणित करण्यात येईल असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तर ३०.११.२००५ ला देण्यात आलेल्या नमूना १२ नियम १७(१) प्रमाणे अर्जदार गॅरहजर राहील्यास अर्ज निकाली काढण्यात येईल असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यामुळे  नमूना १२ नियम १७(१) च्या नोटीसमध्ये बदल करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. परंतु आपण १६.१२.२००५ च्या पत्राने बदल केला नसल्याचे कळविलेले आहे. याबाबत माहिती पाठविण्यात यावी. "

अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आखिव पत्रिका मागण्याच्या अर्जासोबत प्रथम १५/- रुपये भरण्यासाठी राजपत्रात काही तरतूदी दर्शविण्यात आलेल्या नाही. व तरतूदीशिवाय प्रथम १५ रुपये भरणा केल्याशिवाय अर्ज स्विकारता येत नाही. याबाबत कार्यालय क्रमांक ३ ने योग्य माहिती पाठविली नसून कार्यालयाद्वारे करण्यात येणा-या कृतीचे भूमापन अधिकारी क्रमांक ३ यांनी त्यांचे पत्र क्रमांक २६, दिनांक २८.२.२००६ प्रमाणे समर्थन केल्याचे दिसून येते. आखिव पत्रिकेसाठी १५ रुपये घ्यावे असे परिपत्रकात नमूद असताना भूमापन कार्यवाही करणारे प्रती एन्ट्री १५ रुपये कां घेतात असा प्रश्न उपस्थिम केला होता. त्यावर उपलब्ध असलेल्या मराठी प्रतीमध्ये " कलम १२८ अन्वये भूमापन अधिका-याने दाखविलेल्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदीची प्रत्येक प्रमाणित प्रतीस " असा सेवेचा प्रकार दिलेला आहे. व त्याच संदर्भामध्ये संदिग्धता दिसून येत असल्यामुळे सदरचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण सप्टेंबर २५, २००१ ची इंग्रजी

कां करण्यता आलेले नाही. तसेच पावती क्रं.७४८१७६७ दि. ९.८.२००५ प्रमाणे श्रीमती रुपाताई देशमुख यांच्या नावाने आखिव पत्रिकेची मागणी केलेली असतांन आखिव पत्रिका कां निर्गमित करण्यात आली नाही. आपण दि. १६.१२.२००५ प्रमाणे पाठविलेली माहिती दिशाभूल करणारी आहे काय. याबाबत माहिती पाठविण्यात यावी.

४) तात्काळ मोजणीसाठी चालू आर्थिक वर्षात आपल्या कार्यालयात किती अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच तात्काळ मोजणीसाठी प्राप्त झालेल्या किती अर्जदारांच्या प्रकरणांची तात्काळ मोजणीची कार्यवाही केलेली आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

५) केंद्र शासनाचा माहितीचा कायदा २००५ मध्ये दिलेल्या तरतूदी आपल्या कार्यालयास लागू आहे काय. तरतूदी लागू असल्यास माहितीच्या कायदयाअंतर्गत प्राप्त होणा-या अर्जाप्रमाणे माहितीसाठी वेगवेगळी फी भरण्यासाठी कळविणे योग्य आहे काय. आपण दि. १६.१२.२००५ च्या पत्राप्रमाणे वेगवेगळी फी भरण्यासाठी कळविलेले आहे. असे कळविले म्हणजे माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन आहे काय. आपल्या कार्यलयात शासन परिपत्रक क्रं.ममाअ/२००४/प्र.क्र.-१३५/०४/०५ दि.१६.१०.०४ प्रमाणे माहिती देण्यासाठी कार्यवाही करण्यात येते काय. येत असल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २५ सप्टेंबर २००१ हे २५/- रुपये प्रती पृष्ठ विकण्याचे अधिकार आपणास कोणत्या शासन निर्णयाप्रमाणे प्राप्त झालेले आहेत. तसेच शासनाच्या राजपत्राची आणि परिपत्रकाच्या सत्य प्रतिलीपी करण्यासाठी कोणत्या शासन निर्णयाप्रमाणे आपण सक्षम आहात. तसेच शासन निर्णयाच्या आणि परिपत्रकाच्या प्रती मुल्य घवून विकणे याबाबत शासन तरतूद कळविण्यात यावी. वरील प्रमाणे माहिती पाठविण्यात यावी.

६) मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राद्य) पुणे यांच्या दि. २३ नोव्हेंबर, २००१ च्या परिपत्रकाप्रमाणे फक्त अर्जदाराने प्रथम अर्ज करण्यासाठी ५/- रुपयाचा कोर्ट फी स्टॅम्प लावणे अपेक्षित आहे. हे शुल्क नकलेसाठीच्या शोध घेण्यासाठीच्या आणि मोजणी तक्रार/फेर फार नोंदीसाठीच्या करण्यात येणा-या अर्जावर लावणे आवश्यक आहे. इतर साध्या

नागपूर यांनी पुन्हा त्यांना सविस्तर अशी कार्यालयीन कार्यपध्दतीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीसाठी उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे. व सोबत महाराष्ट्र लॅन्ड रेव्हन्यू मॅन्युअल व्हाल्यूम-१, पृष्ठ २०१ ते २११ चे छायांकित प्रती दाखल केलेल्या दिसून येते. तसेच महाराष्ट्र शासनाचे राजपत्र असाधारण मंगळवार, २५ सप्टेंबर, २००१ भाग-४ ब मधील महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेली (भाग-१ अ व १ ल यामध्ये प्रसिध्द केलेले अधिनियम व आदेश)महसुल व वन विभागाची अधिसूचना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ अन्वये ची मराठी प्रत दाखल केलेली दिसून येते.

" महारष्ट्र शासन राजपत्र दि. २५ सप्टेंबर २००१ अन्वये आखिव पत्रिका मागणी अर्जासोबत १५ रुपये भरण्यासाठी कोठेही तरतूद नाही. संबंधित राजपत्रात प्रमाणित प्रतीसाठी १५ रुपये भरणा करण्याची तरतूद आहे. असे असतांना आपण पत्र क्रं.२६/अंबाझरी/माहितीचा अधिकार/२००५ दि. १६.१२.२००५ अन्वये संघटनेस दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. याबाबत माहिती पाठविण्यात यावी.

२) मी दिनांक १६.८.२००५ ला म्युटेशनसाठी अर्ज केलेला होता. परंतू माझा अर्ज १५.१२.२००५ ला निकाली काढून फेर फार नोंद घेण्यात आली. यामुळे महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक १००५/३४/प्र.क्र.८/२००५/१८ दि. ०७.०४.२००५ च्या परिपत्रकाचे उल्लंघन झालेले असताना आपण १६.१२.२००५ च्या पत्राप्रमाणे अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात येते असे कळविलेले आहे. ४ महिन्यानंतर अर्जावर विचार करुन प्रकरण निकाली काढणे म्हणजे परिपत्रकाप्रमाणे विहिती मुदतीत कार्यवाही करणे आहे काय. याबाबत माहिती पाठविण्यात यावी.

३) श्रीमती रुपाताई रणजीत देशमुख यांचे नामांतरण फेर फार क्रंञ३७८/२००० दिनांक ११.९.२००१ नुसार नामांतरण केलेले असल्यास आपल्या कार्यालयाने दि. २८.११.२००५ ला निर्गमीत केलेल्या १६८/१७३ च्या आखिव पत्रिकेत श्रीमती रुपाताई देशमुख यांचे नाव समाविष्ट

सुनावणी न घेता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना अपीलाचे उत्तर देण्यास सांगितले त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्त्यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

२. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना गट विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय यांचेकडे त्यांच्याविषयी दिनांक २३.११.२००५ पर्यंत जे तक्रार अर्ज प्राप्त झालेले असतील त्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३. संबंधीत तत्कालीन माहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी त्यांची विभागीय चौकशी करण्याची अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शिफारस करण्यात येत आहे. चौकशी करुन व जबाबदारी निश्चित करावी.

४. निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

५. सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १९.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

मागितलेली होती ती दिनांक १३.७.२००५ रोजीचे गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर यांचेकडी श्री पू.वा.शेळके, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, शाळा आसेगांव, सदर शिक्षकाचे शैक्षणिक काम असमाधानकारक असून शाळेत अनियमित असतात. तसेच आपल्या पंचायत समिती स्तरावर लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर शिक्षक राजकारणात अप्रत्यक्षरित्या सहभागी असतात. सदर शिक्षक निलंबीत झाले होते. त्याआधारावर ते वरिष्ठांच्या आदेशांचे अवमान करणे, अधिका-यांच्या खोटया तक्रारी करुन वरिष्ठांना बदनाम करतात. त्यामुळे त्यांची बदली अति महत्वाची वाटते. यावरुन अपीलकर्ता यांनी माहिती मागितली होती असे त्यांचे म्हणणे आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २५.१.२००६ रोजी जावक क्रमांक २७८/०६ प्रमाणे अपीलकर्ता यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी " आपणास कळविण्यात येते की, श्री अ.मु. चव्हाण, यांनी मा. शिक्षणाधिकारी पदावर प्रभारी असताना काय चुकीची माहिती दिली याबाबत आपण अर्जासोबत माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांना कोणत्या कारणास्तव निलंबित केले हे या कार्यालयास अवगत नाही" असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना कोणत्याही प्रकारचे तसे पत्र मिळालेले नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.११.२००५ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २.१२.२००५ रोजी म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे जो तक्रार अर्ज दाखल झालेला होता तो तक्रार अर्ज हा जिल्हा परिषदेकडून त्यांनी दिनांक १३.७.२००५ रोजी जी माहिती उपलब्ध झाली आहे त्यावरुन असे दिसून येते की, त्यांच्या विरुध्द तक्रारी आलेल्या होत्या व त्याबध्दलची त्यांनी छायांकित प्रत मागितली हाती. परंतु तेही नाकारलेले असल्यामुळे प्रथम अपील दाखल केले होते. परंतु प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी घेण्यात आली नाही व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे माहिती खोटी उपलब्ध करुन दिल्याबध्दल दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४९९/२००८**

**१) श्री पुंडलीक वागजी शेळके (उ.श्रे. मुख्याध्यापक) — अपीलकर्ता**
**जि.प.प्राथमिक मराठी शाळा, आसेगांव**
**ता. मंगरुळपीर, जिल्हा वाशिम.**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम.**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती, मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर, जि.अकोला. — उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १९.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००५ रोजी " शैक्षणिक काम असमाधानकारक, अनियमितता याबाबत पं.स.स्तरावर लेखी तक्रारी प्राप्त झाल्या त्याची नक्क्ल प्रती सर्टिफाईड मिळणे बाबत." माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २.१२.२००५ रोजी माहितीच्या अधिकाराबाबतची मागणी केलेली माहिती श्री अ.मू.चव्हाण, प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांना मागणी केली असता त्यांनी खाली संदर्भाचे पत्र आहे.

श्री अ.मु.चव्हाण, प्रभारी गट शिक्षणाधिकारी ; यांचे वक्तव्यानुसार माझ्याकडे संदर्भात कोणतीच कागदपत्रे लेखी स्वरुपात नाही अशा प्रकारचे उत्तर अपीलकर्ता यांना त्यांनी दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी जिल्हा परिषद संदर्भाने माहितीच्या अधिकारामध्ये जी माहिती

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**( अपील क्रमांक ११२५/२००८)**
**स्थगनादेश अर्ज क्रं.१०३६/२००८**

**१) श्री गोविंद रामानंद समर्थ,**
**सदगुरु प्रल्हाद महाराज (रामदासी) संस्था,**
**साखरखेडा, रजि.नं.२८०, ता.सिंदखेडराजा**
**जिल्हा बुलढाणा.**
**मार्फत मुख्य विश्वस्त श्री भाष्करराव शंकरराव कुळकर्णी. .. अर्जदार-अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रवीण अच्युतराव महाजन,**
**१८१, बाजार रोड, गोकुळपेठ, नागपूर-१०. गैरअर्जदार-उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२००८)**
**अंतरिम निर्णय**

अपीलकर्ता अर्जदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा यांचे दिनांक २०.५.२००८ चे निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये गैरअर्जदार-उत्तरवादी यांचे प्रथम अपील मंजूर करण्यात आलेले असून अर्जदार-अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यावर आवश्यक ती उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात यावी, असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयाचे अनुषंगाने अर्जदार-अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार-उत्तरवादी हे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सारखा आग्रह करीत आहे. परंतु सदरचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सदरच्या विश्वस्त संस्थेस लागू नाही. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिल्यास संस्थेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. व त्यामुळे दाखल केलेल्या अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या निर्णयास स्थगिती द्यावी, असा विनंती अर्ज दाखल केला आहे.

बदल्यांचे प्रतीनियुक्तीचे आदेशाच्या साक्षांकित प्रती दया. ४) मुद्या क्रं. १ ते ३ च्या शासन नियम निकस अटी यांच्या साक्षांकित(जीआर) च्या प्रती."

दिनांक २.३.२००७ रोजी गट विकास अधिकारी उच्च श्रेणी यांनी अपीलकर्ता यांना "वरील संदर्भांकित पत्रानुसार मागविण्यात आलेली माहिती तयार करण्यात आली आहे. आपण आवश्यक ती फी टपालाद्वारे भरुन कार्यालयातून माहिती घेऊन जावी." अंदाजे रुपये २००/- खर्च असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसते. अपीलकर्ता यांनी शाखाधिकारी, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मर्यादित अकोला यांचेकउे रुपये २००/- माहितीचा खर्च म्हणून भरलेला दिसून येतात व दिनांक ६.३.२००७ रोजी सदरची चालन रिसिव्ह अशी सही दिसून येते. परंतु सही ओळखता येत नाही. परंतु, त्यानंतर माहिती उपलबध झाली नाही म्हणून दिनांक १७.२.२००६ रोजी प्रथम अपील दखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दिनांक ९.४.२००७ रोजी दाखल केल्याचे दिसून येते.

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००७ रोजी जी माहिती मागितली ती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असल्यामुळे त्यांनी ती माहिती दिनांक २.३.२००७ पर्यंत स्वतः माहिती अधिकारी यांचेकडे जावून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. व ती व्यक्तीशः ३० दिवसात माहिती घेण्यास कळविले नाही म्हणून त्यांना दिनांक २.३.२००७ रोजी माहितीचा खर्च कळविण्यात आलेला दिसून येतो. त्याही पूर्वी दिनांक १५.२.२००७ व दिनांक १.३.२००७ रोजी स्मरणपत्रे दिलेले दिसून येते. परंतु माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, जन माहिती अधिकारी यांना ते भेटत नाही व अर्ज कार्यालयात देवून जातात. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी रुपये २००/- चलनद्वारे भरल्याचे गट विकास अधिकारी यांचे कार्यालयात कळविलेले दिसते. विस्तार अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांनी आता सुध्दा माहिती घेवून जावी असे कळविलेले होते. ते माहिती घेण्यास येत नाही. गट विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, त्यांनी माहिती व्यक्तीशः

कार्यालयामध्ये गेले होते. परंतु, त्याबाबतचा पुरावा नाही. तसेच दोन साक्षीदाराच्या समक्ष त्यांच्या घरावर पत्राची प्रत चिकटविण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळे त्यांना विहित मुदतीत मागितलेल्या माहितीच्या संदर्भात शुल्क भरण्याच्या बध्दल कळविण्यात आलेले असल्यामुळे व त्यांनी माहितीचे शुल्क भरलेले नसल्यामुळे दिनांक २०.१०.२००६ रोजी सुध्दा युपीसीने त्यांचेकडे सचिव ग्राम पंचायत, शिवर यांनी पुन्हा पत्र दिलेले दिसते. त्यानंतरही अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरलेले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यावरुन अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत त्यांना माहितीचे शुल्क भरण्यास सांगून माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केलेले आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता हे जेव्हा माहितीचे शुल्क भरतील तेव्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.१०.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक १६.१०.२००६ व दिनांक २०.१०.२००६ रोजी मागितलेल्या माहितीच्या खर्चाचे शुल्क रुपये १५०/- हे भरावयास कळविले असल्यामुळे व त्यांनी सदरचे शुल्क भरलेले नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १८.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

स्वतः जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी व सदरच्या पत्राची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना पाठविलेली दिसून येते. तरी सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१०.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १६.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एकुण रुपये १५०/- माहिती शुल्क रक्कम ग्राम पंचायत कार्यालयात आणून रकमेची पावती घेवून माहिती घेवून जावी असे पत्र पाठविलेले दिसून येते. सदरचे पत्र श्री संजय जाधव यांना माहितीच्या अधिकाराबाबत रक्कम भरणा करण्याची नोटीस दिनांक १६.१०.२००६ ला दिली असता नोटीस घेण्यास नकार दिला. त्यामुळे माहिती ग्राम पंचायत लिपिक व गावातील साक्षीदार दोघा समक्ष त्यांच्या घराच्या समोरील दरवाज्याला नोटीस चिकटविली व साक्षीदाराच्या सहया खालीलप्रमाणे घेतल्या व प्रत सचिवाकडे सादर केली.

१) साक्षीदार १) श्री संतोष भा. गावंडे २) श्री सचिन ऊर्फ मनोज देवलाल राऊत तसेच श्री मा.वा. घुगे, ग्राम पंचायत लिपिक, शिवर असे लिपिक यांची सही आहे व श्री राऊत व श्री गावंडे यांच्या पण स्वाक्ष-या आहेत. सदरची नोटीस त्यांनी स्वतः न घेतल्यामुळे दिनांक २०.१०.२००६ रोजी युपीसीने श्री संजय विठठलराव जाधव, मु. शिवर, वार्ड क्रं.२, अकोला या पत्यावर पाठविण्यात आलेले दिसून येते. त्यावर ३ रुपयाचे तिकिट आहे व दिनांक २०.१०.२००६ चा स्टॅम्प आहे. त्यानंतर दिनांक १२.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी ग्रामसेवक यांचेकडे एक स्वतंत्र अर्ज करुन त्यामध्ये गांवात मुलांच्या खेळण्यासाठी खुले मैदान नसल्याबाबत तक्रार अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या तक्रार अर्जामध्ये माहिती मागितलेल्या माहितीच्या अर्जानुसार मला ग्रामपंचायतने माहिती दिली आहे, असे लेखी देवून, त्यामध्ये मुलांच्या खेळण्यासाठी खुले मैदार नसल्याबाबत तक्रार केलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी अर्जात व्यक्तीशः माहिती घेतो असे नमूद केले असेल तर अपीलकर्ता यांना व्यक्तीशः माहिती अधिकारी यांचेकडे ३० दिवसांच्या आंत जावून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. व तसे केल्यास व माहिती उपलब्ध करुन न दिल्यास आक्षेप घेणारे पत्र देवून पोच घ्यावयाची असते. याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते ग्राम पंचायत

स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल] अशी माहिती;" प्रकट करण्यास प्रतिवाद करण्यात आलेला आहे. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही परीक्षार्थीनी भरलेली आवेदन पत्राची आहे. व त्यामुळे परीक्षेची प्रक्रिया, निकाल प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदरच्या आवेदन पत्राची माहिती उपलब्ध करुन दिल्यास परीक्षार्थीस त्याबाबतची हानी पोहचू शकते. व त्यावरुनच सदरचे कलम ८(१) (घ) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला दिसून येतो. परंतु कोणत्याही स्पर्धात्मक अशा प्रकरणांतील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये ती निर्णय प्रक्रिया सुरु असेपर्यंत माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही.परंतु ती निर्णय प्रक्रिया संपल्यानंतर त्या निर्णय प्रक्रियेतील संपूर्ण कागदपत्रासहित माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असते. निर्णय झाल्यानंतर कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला होनी पोहचण्याची शक्यता नसते. निर्णय जर नियमानुसार झालेला असेल तर त्यात बदल होणे शक्य नसते. परंतु, मुळातच निर्णय प्रक्रियेत जर काही त्रुटी असेल तर अर्थातच तो निर्णय बदलू शकतो व त्याचा फायदा हा अर्थातच त्यांनी जाणूनबुजून निर्णय प्रक्रियेमध्ये त्रुटी ठेवल्यास त्यांना मिळू नये व त्यामुळे त्यांच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचेल याबाबत विचार करण्याची आवश्यकता नाही. उलटपक्षी त्यामध्ये पारदर्शकता येईल व जबाबदारपणा अधिक येण्याची आवश्यकता आहे. व त्यामुळे सदरच्या परीक्षेची प्रक्रिया संपूर्ण निकाल झालेला असल्यास अपीलकर्ता यांनी मागितलेली आवेदन पत्राची माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मुद्याम नाकारलेली आहे असा जो आरोप केलेला आहे त्यात अर्थातच निर्णय घेताना हा बदललेला निर्णय हा त्यांच्या स्वतःच्या निर्णय क्षमतेप्रमाणे त्यांनी अभिप्राय दिलेला असल्यामुळे ते अभिप्राय सदभावनेने दिलेले असतात असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. कोणत्याही एखादया कायदयाच्या तरतूदींचा अन्वयार्थ हा वेगवेगळा लावला जातो व त्यामुळे अर्थातच संबंधीत जन माहिती अधिका-याला दोषी धरणे आवश्यक नाही. परंतु सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परिपत्रके, शासन निर्णय जे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत व खुलाशा मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी जे विश्लेषण कलेले आहे ते अर्थातच निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भात आहे. व निर्णय प्रक्रियेतील कोणत्याही गुणवत्तेच्या

३१.१.१९८९ ची प्रत अनुक्रमांक ८ (घ) परिशिष्ट क्रमांक ९ ची प्रत व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ परिशिष्ट-६ ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिनांक २५.३.२००७ रोजी प्राप्त झाली अशी नोंद आहे. परंतु सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी लेखी खुलासा दाखल केला आहे. लेखी खुलाशातील परिच्छेद क्रमांक १४ मध्ये गैरअर्जदार क्रमांक २ यांनी अपीलार्थीस माहितीबाबतचा मुद्या क्रमांक २ बाबत जे दस्तऐवज पाठविले त्यात काही मिस्त्री श्रेणी-१ या परीक्षेकरीता बसू देण्याबाबत उल्लेख नाही. तसेच परीक्षेचे आवेदनपत्र आणि सन २९९४ चे परिपत्रकानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील पाच वर्षे सेवा पूर्ण व तांत्रिक सहायक पदावरील कर्मचा-यांची १० वर्षे सेवा पूर्ण असेल तरच तो कर्मचारी प्रवेश अर्ज सादर करुन शकतो. या परिपत्रकात जी प्रमाणपत्रे भरुन द्यावयाची आहेत त्यातही मिस्त्री श्रेणी-१ पदाचा कोठेही उल्लेख नाही. तसेच परिच्छेद क्रमांक ११ मध्ये गैरअर्जदार क्रमांक २ यांनी पाठविलेले माहितीनुसार अनुभाग क्रमांक १ मधील अनुक्रमांक ८ (घ) नुसार संबंधीतांनी परीक्षेकरीता भरलेले आवेदन पत्राची प्रत देण्यासाठी नकार दिला ही बाब अपीलार्थीस अन्याय व चुकीचा अर्थ लावून हेतूपुरस्पर नाकारणे या सदरात मोडणारी आहे. मुख्य म्हणजे मागितलेली माहिती कलम ८ (घ) शी संबधीत नाही. त्यामुळे माहिती नाकारणे म्हणजे कलम ७(१) चे उल्लंघन ठरत असल्यामुळे माहिती अधिकारी कलम २० (१) प्रमाणे रुपये २५,०००/- शास्ती लादण्यास पात्र ठरतात असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

सदरचा खुलासा पाहाता अधिनियमाचे कलम ८ (घ) च्या संदर्भामध्ये विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

" (घ) वाणित्य क्षेत्रातील विश्वासाहर्ता, व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी पकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या

श्रेणी यांच्या परीक्षेकरीता पुरविलेले आवेदन पत्राची सत्यप्रतीची मागणी केलेली आहे. तथापि भारताचे राजपत्र अनुभाग मधील अ.क्रं.८ (घ) अन्वये आपण मागणी केलेली माहितीच्या कागदपत्राची सत्यप्रत देता येत नाही. २) मिस्त्री श्रेणी-१ या पदावर कार्यरत कर्मचा-यांना ज्याआधारे व्यावसायिक परीक्षेकरीता अनुमती दिली त्याबाबतचे नियम व आदेश महाविद्यालयाना जरी कळविले तरी सन २००४ च्या परिपत्रकाची सत्यप्रत सोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरची प्रत अपीलकर्ता यांना दिनांक २३.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याची नोंद दिसून येते. परंतु, सदरच्या उपलब्ध माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदर प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये पुन्हा उपसंचालक (प्रशासन) यांनीच अपीलकर्ता यांना माहिती मागविण्यासाठी केलेल्या सही करणा-याच्या संबंधाने आपण पाठविलेल्या दिनांक १७.२.२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आपल्याला पुरविण्यासाठी वरील माहिती तयार आहे. आपणास ही माहिती पुरविण्यासाठी मागिल माहितीचे धरुन अतिरिक्त शुल्क रुपये ४०+२०=६० (नोंदणीकृत व टपाल शुल्क) जमा आहे. हे शुल्क आपण या कार्यालयाकडे पदान करावे किंवा मनी ऑर्डरद्वारे पाठवावे किंवा शासकिय कोषागारात भरणा करावे व या कार्यालयास चालनची एक प्रत पाठवावी. पत्र प्राप्तीपासून ७ दिवसांचे आंत शुल्क प्रदान करावे, असे दिनांक ३.३.२००७ रोजी कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक १०.३.२००७ रोजी प्राप्त झाल्याची नोंद आहे. त्यावर दिनांक १३.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी मनीऑर्डरने खर्चाचे शुल्क पाठविलेले दिसते. व दिनांक १४.३.२००७ राजी अधीक्षक अभियंता तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अनुभाग एक मधील अ.क्रं. ८ (घ) अन्वये नमूद केल्यानुसार आपणास जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत मिस्त्री ग्रेड-१ याच्या परीक्षेकरीता भरलेल्या आवेदन पत्राची सत्यप्रत देता येणार नाही असे यापूर्वी संदर्भ क्रमांक २ (दिनांक १६.१.२००७ चे) अन्वये कळविण्यात आलेले आहे. सोबत छायांकित प्रत माहितीसाठी पाठविण्यात येत आहे. मिस्त्री श्रेणी-१ या पदावर कार्यरत कर्मचा-यांना ज्या आधारे व्यावसायिक परीक्षेकरीता अनुमती दिली त्यासंबंधात असलेले शासन निर्णय दिनांक ७.१०.१९८६ व

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६५०/२००८**

**१) श्री मनोहर मारुतीराव कुळकर्णी**
**देवराव बाबा चाळ, रजपूत पूरा, अकोला-४४४००१**
**ता.जिल्हा अकोला.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व सहसंचालक**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, दिंडोरी मार्ग,**
**नाशिक -४२२००४.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (प्रशासन)**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, दिंडोरी मार्ग,**
**नाशिक -४२२००४.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १८.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक२३.१२.२००६ रोजी कनिष्ठ अभियांत्याची व्यावसायिक परीक्षा फेब्रुवारी, २००४ मधील व्यावसायिक परीक्षेचे १) जि. प. अकोला अंतर्गत माहिती- मिस्त्री श्रेणी-१ यांच्या परीक्षेकरीता भरलेल्या आवेदन पत्राच्या सत्यप्रती. १) श्री वा.बा.राठोड, मिस्त्री श्रेणी-१, आसन क्रमांक ३०३०६३ २) श्री एम.एस. भोकरे, मिस्त्री श्रेणी-१, आसन क्रमांक ३०३०४१.
मिस्त्री श्रेणी-१ या पदावर कार्यरत कर्मचा-यांनी ज्या आधारे व्यावसायिक परीक्षेकरीता अनुमती दिली त्या अभिलेख्यांच्या सत्यप्रती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२००७ रोजी उप संचालक (प्रशासन) तथा शासकिय माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना १) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत मिस्त्री

सांगितले. त्याप्रमाणे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता मुद्या क्रमांक १ मधील माहिती ही विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था (बँक) यांचेकडील जर असेल तर ती जिल्हा उपनिबंधक किंवा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे तसेच उर्वरित मुद्यांची माहिती ही शासनाने चौकशी सुरु केली असल्यामुळे ती शासनाकडून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक झाले असते.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये जर सुनावणी घेतली असती व निर्णय दिला असता तर अर्थातच अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन देता आली असती. सुनावणीच्या संदर्भामध्ये व निर्णयाच्या संदर्भामध्ये जी कागदपत्रे दाखल केली आहे त्यावरुन खरोखर सुनावणी घेतली आहे असे म्हणता येत नाही व अपीलकर्ता यांना सुध्दा दिनांक ३.४.२००७ चा निर्णय मिळाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली आहे असे दिसून येते.

अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जिल्हा उपनिबंधक किंवा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे अर्ज करावयास पाहिजे होता.परंतु तसे त्यांनी केलेला दिसत नाही. मात्र बँकेकडील ती माहिती नसल्यामुळे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडील ही माहिती नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १६.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ प्रमाणे विभागीय सह निबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी गैर कायदेशीर नौकर भरती बाबत दि. २५.११.०५ रोजी जो कार्यवाहीसाठी आदेश दिला त्या आदेशाविरुध्द शासनाकडे बँकेने जे अपील दाखल केले त्या संपूर्ण कागदपत्राच्या प्रती.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ प्रमाणे विभागीय सह निबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी गैर कायदेशिर नोकर भरती बाबत दिनांक २५.११.०५ रोजी जो कार्यवाहीसाठी आदेश दिला त्या आदेशाविरुध्द शासनाकडे बँकेने जे अपील दाखल केले त्या अपीलावर जो शासनाने स्थगनादेश दिला त्या स्थगनादेशाची संपूर्ण प्रत.

५) बँकेने खरेदी केलेल्या संगणक व्यवहारात अनियमिततेबाबत मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी दि. ४.२.०६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी आदेश दिला. त्या चौकशी आदेशाची संपूर्ण प्रत."

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २६.२.२००७ रोजी मागणी केलेली कागदपत्रे ही बँकेच्या दस्तऐवजातील मुळ दस्तऐवजाचा भाग नसल्यामुळे सदर मुद्यांची माहिती बँकेस पुरविता येत नाही. सदर माहिती आपण माननीय विशेष लेखा परिक्षक, महाराष्ट्र शासन व माननीय विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे संपर्क साधून माहिती घ्यावी असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.१००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलात कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नसल्यामुळै अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस शासकिय माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे. सदरच्या खुलाशामध्ये बँकेचे कायदे तज्ञाकडून दिनांक २२.२.२००७ रोजी लेखी सल्ला प्राप्त झाल्यानंतर उत्तरवादीनी अपीलकर्ता यांना वरीलप्रमाणे कळविले. तसेच युक्तिवाद करताना जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्यांचे संदर्भात स्पष्टीकरण केले व त्या स्पष्टीकरणामध्ये मागितलेली माहिती ही बँकेकडून/शासनाडून मिळालेली आहे व त्यामुळे ती बँकेची मुळ माहिती नाही, मुळ दस्तऐवजाचा भाग नाही व म्हणून ती देता येणार नाही, असे

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६३४/२००८**

**१) श्री दिलीप दगडूजी वानखेडे**
**शरद प्रोव्हीजन जवळ, पुंडलीक नगर,**
**चिखली, ता.चिखली, जिल्हा बुलढाणा-४४३२०१.**

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, अमरावती, ता.जि. अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक**
**दि बुलढाणा जिल्हा केंद्रिय सहकारी बँक मर्या.बुलढाणा**
**सहकार भवन, ता.जि. बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.६.२००८ )**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :-**

१) दि बुलढाणा जिल्हा केंद्रिय सहकारी बँक मर्यादित बुलढाणा हया आपल्या बँकेने केलेल्या नोकर भरती संबंधी आपल्या बँकेचे सन २००३-०४ चे विशेष अंकेशन झालेले आहेत. त्याची प्रत मा. विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था (बँक) यांनी आपल्या बँकेकडे दिलेले आहे. त्या विशेष अहवालाची संपूर्ण प्रत.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ प्रमाणे विभागीय सह निबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी गैर कायदेशीर नोकर भरती बाबत दि. २५.११.२००५ रोजी जो कार्यवाहीसाठी आदेश दिला त्या आदेशाची संपूर्ण प्रत.

सदरची माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून दिनांक १७.२.२००७ राजी पुन्हा गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती यांचेकडे अपील दाखल केले व त्याबाबतचा निर्णय दिला नाही या कारणाकरीता द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे दिनांक ३.३.२००७ रोजी सचिव, ग्राम पंचायत कापसी (रोड) यांनी गट विकास अधिकारी यांचे दिनांक २.३.२००७ चे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याच्या आदेशाप्रमाणे ग्राम पंचायत कर्मचारी श्री महादेव पु. वरडकार यांनी पोलीस पाटील कापसी (रोड) यांच्या समक्ष श्री चौके यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे व माहिती दिल्याची पोच सुध्दा दिली आहे असे दस्तऐवज दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असून सुध्दा त्यांनी प्रथम अपीलावर द्वितीय अपील कां दाखल केले असे गट विकास अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष सचिव, ग्राम पंचायत यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी व त्यांनी पोच दिली असली तरी त्यांच्या नेहमीच्याच सवयीप्रमाणे स्वतःची सही नाही असे सांगून त्रास देत असतात. तसेच आयोगाकडील एका अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी सचिव, ग्राम पंचायत यांना त्रस्त केल्यामुळे व धमकी दिलेली असल्यामुळे सचिव, ग्राम पंचायत यांनी आत्महत्या करणार असा आयोगाकडे खुलासा केलेला होता. त्यामुळे आयोगानी श्री चौके यांच्या संदर्भामध्ये पोलीस चौकशी करावी असे आदेश दिलेले होते.

यावरुन अपीलकर्ता यांची माहिती मागण्याची मानसिकता दिसून येते. व या प्रकरणात सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे स्वतः सचिव, ग्राम पंचायत हे

२) दिनांक १७.१.२००७ च्या अप्पर जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्णयावर सचिव ग्रा.पं. कार्यालय कापशी रोड ता.जि.अकोला यांनी सरपंच पद तसेच सदस्यपद रिक्त असल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे काय. केला असल्यास अहवालाची सत्यप्रत दयावी. केला नसल्यास आपण त्या संबंधी ग्रा.पं. सचिवाकडे त्या संबंधीता पत्रव्यवहार केला काय. केला असल्यास सदर पत्रव्यवहाराची सत्यप्रत दयाव. केला नसल्यास कारण मिमांसेचा सविस्तर तपशिल दयावा.

३) दि. १७.१.२००७ च्या अप्पर जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्णयावर आपण ग्रा.पं. सचिव कापशी रोड ता.जि.अकोला यांच्या कडून निर्णयांमध्ये नमूद केलेल्या दंडात्मक कार्यवाहीचा दंड वसुल केला काय. केला असल्यास तो कशाप्रकारे केला याचा सविस्तर तपशिल दयावा. केला नसल्यास कां केला नाही त्या संबंधी कारण मिमांसा दयावी.

४) दि. १७.१.२००७ च्या अप्पर जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्णयानुसार दोषी ग्रा.पं.सचिव कापशी रोड ता.जि.अकोला यांची कार्यप्रणाली सदोष असल्याचे आढळते. त्यावर आपले कार्यालयामार्फत मार्गदर्शक सूचना वजा नोटीस सदर ग्रा.पं.कापशी रोड सचिवास दिले गेले आहे काय. दिले असल्यास त्याची सत्यप्रत दयावी. दिली नसल्यास का दिली नाही याची कारण मिमांसा करावी.

५) दि.१७.१.२००७ च्या अप्पर जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्णयानुसार ग्रा.पं.कार्यालय कापशी रोड ता.जि.अकोला रिक्त असलले सरपंच पद भरण्या संदर्भात आपल्या कार्यालयामार्फत कोणती कार्यवाही केली गेली आहे. सदर कार्यवाही संदर्भातील दस्तऐवजांच्या सत्यप्रती दयाव्यात व केली नसल्यास संपूर्ण कारण मिमांसेचा तपशिल दयावा.

६) दिनांक १७.१.२००७ च्या अप्पर जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्णयानुसार सरपंच पद रिक्त असल्यामुळे ग्रा.पं.कापशी रोड, ता.जि.अकोलाचा कारभार कोणामार्फत चालतो याची माहिती सविस्तर माहिती दयावी.

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६३०/२००८**

**१) श्री सतिश गणपतराव चौके**
**मु.पो. कापशी (रोड), ता.जि.अकोला**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी (वर्ग-१)**
**पंचायत समिती, अकोला, ता.जि.अकोला**
**३) जन माहिती अधिकारी**
**पंचायत समिती, अकोला** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.६.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अकोला गट विकास अधिकारी, अकोला (वर्ग-१) पंचायत समिती, अकोला यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून यते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :-**

१) दि. १७.१.२००७ च्या अप्पर जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्णयावर आपण कोणती कार्यवाही केली. केली असल्यास तपशिल दयावा. कार्यवाही केली नसल्यास संपूर्ण कारण मिमांसेसहीत संपूर्ण व सविस्तर तपशिल दयावा व सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आपणासी झालेल्या पत्र व्यवहारा संबंधी तपशिल देवून सदर पत्रांच्या सत्यप्रति दयाव्यात.

अर्जातील मागितलेल्या माहितीचे  अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी मोघम अशी माहिती मागितलेली दिसून येते व त्यामुळे दिनांक १९.१०.२००७ रोजी जे उत्तर दिले आहे ते योग्य असून प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य आहे.

**अपील क्रमांक १५५०/२००७** :- मध्ये अपीलकर्ता यांनी कु. अर्पना विनायक तुमडाम यांचे सन २००० ते २००७ या कालावधीतील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांनी दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या संबंधातील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितलेल्या दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना महिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने कलम ११(१) अन्वये कार्यवाही करीता आपण ज्या व्यक्तीची महिती मागितली त्या व्यक्त्िच्या पत्रव्यवहाराचा पत्ता अर्जात दिलेला नसल्याने कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाशी पत्रव्यवहार होऊ शकला नाही. सबब वरील कारणास्तव अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे माहिती अधिकारी यांनी अपीलीकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.१०.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांचा निर्णय काम करण्यात आला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.६.२००७ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरच्या माहितीचे वर्णन मोघम स्वरुपाचे असल्यामुळे जन माहित अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय सुध्दा योग्य आहे.

अपीलकर्ता यांच्या वरील सर्व अपीलांच्या सुनावणीमध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचेकडे मोजक्या प्रकरणाची माहिती न मागता वारंवार मोठया प्रमाणावर शेकडो प्रकरणात माहिती मागण्याचा ओघ सतत सुरु आहे. त्यामुळे अधिनियमाचे कलम ८ (ञ) अन्वये मागितलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाशी संबंधीत नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती कलम ८ (ञ) तसेच कलम ७ (९) अन्वये फेटाळण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी उमेदवारांची फक्त नांवे दिलेली आहे व माहितीचा कालावधी सन २००० ते २००७ असा दिलेला असल्यामुळे सात वर्षाच्या कागदपत्रामधून सदरची माहिती शोधून त्यानंतर कलम ११ प्रमाणे कार्यवाही करणे हे अश्यक असल्यामुळे सदरचे दिलेले उत्तर हे योग्य आहे. व तेच प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा योग्य आहे.

**अपील क्रमांक १५४९/२००७** :- मध्ये दिनांक २१.७.२००७ रोजी सन २००१ ते २००२ या कालावधीतील श्री विनायक सांबा तुमडाम यांना दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भात माहिती मागितल्याचे दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९.१०.२००७ रोजी श्री विनायक सांबा तुमडाम यांची माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या संबंधात असल्याने कलम ११ (१) अन्वये आपण व्यक्तीच्या पत्रव्यवहाराचा पत्ता न दिल्याने त्रयस्थ पक्षाचे म्हणणे मागण्याची कार्यवाही करता येत नाही. आपला अर्ज कलम ११(१) अन्वये फेटाळण्यात येत आहे, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे दिनांक २१.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक १६.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांचे एकुण पाच अपीलाचे संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे श्री विनायक सांबा तुमडाम यांचे संदर्भात सुध्दा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेले दिसून येतो. व सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आलेला दिसून येत नाही. व म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय कां देण्यात आला नाही याबध्दल विचारले असता अपीलकर्ता यांचे शेकडे अर्ज व शेकडो प्रथम अपीले असल्यामुळे व प्रथम अपीलात कोणत्याही प्रकारचा नवीन निर्णय देता येत नसल्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा केला.

अपीलकर्ता यांच्या वरील नमूद केलेल्या अर्जामधील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता एकुण ४७ उमेदवारांच्या संदर्भात जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही १९९५ ते २००२ या कालावधीतील दिसून येते. व ती देणे हे जन माहिती अधिकारी यांना शक्य नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन व ती माहिती मोघम मागितलेली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना जे उत्तर दिनांक २६.९.२००६ रोजी देण्यात आले आहे ते योग्य आहे.

**अपील क्रमांक १५४८/२००७** :- मध्ये अपीलकर्ता यांनी सन २००० ते २००७ या कालावधीतील श्री नरेंद्र सि. कुळमेथे यांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी दिलेल्या वैधता प्रमाणपत्राबाबत सर्व कागदपत्रांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांचे दिनांक १४.६.२००७ चे एकुण ८ अर्ज व दिनांक २२.६.२००७ चे एकुण ५ अर्जाकरीता, "वरील संदर्भीय अर्जानुसार आपण मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) अन्वये कार्यवाही सुरु आहे. त्रयस्थ पक्षाकडून परवानगी प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल. परवानगी प्राप्त न झाल्यास वरील सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहे असे समजण्यात यावे. करीता कळविण्यात येत आहे, असे कळविल्याचे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २३.१०.२००७ रोजी एकुण १० अर्जातील प्रथम अपीलाचा निर्णय हा कळविण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. तसेच शासकिय

**अपील क्रमांक १६२६/२००७** :- मध्ये अपीलकर्ता यांनी सन १९९५ ते २००२ या कालावधीतील एकुण ९ उमेदवारांच्या संदर्भात वैधता प्रमाणपत्र व इतर कागदपत्राची प्रमाणित प्रत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

**अपील क्रमांक १६२६/२००७, १६२७/२००७ :-** मध्ये दिनांक ३०.८.२००७ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये एकुण ४७ व्यक्तीच्या माहितीची मागणी केली आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक २६.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी वरील संदर्भीय एकुण ५ अर्ज प्राप्त असून सदर ५ अर्जानुसार आपण एकुण ४७ नांवे नमूद व्यक्तीशः माहितीची मागणी केली आहे. सदर एकुण ४७ व्यक्तींच्या संबेधात माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने कलम ११ (१) नुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. तसेच सदर व्यक्तीच्या पत्रव्यवहाराचा पत्ता किंवा पत्रव्यवहाराकरीता आवश्यक माहिती आपण अर्जात नमूद केलेली नसल्याने कलम ११(१) खाली कर्यवाही करता आली नाही असे कळवून अर्ज फेटाळण्यात आलेला आहे, असे दिसून येते.

**अपील क्रमांक १६२८/२००७ व १६२९/२००७** :- मध्ये पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी एकुण २१ उमेदवारांची सन १९९५-२००२ या कालावधीतील वैधता प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.८.२००७ च्या एकुण ४ अर्जाच्या संदर्भामध्ये आपण एकुण (३९) व्यक्तीच्या संबंधीत माहिती मागितलेली आहे. तथापि, ३९ व्यक्तीची त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे कलम ११(१) खाली कार्यवाही करण्याकरीता माहिती आवश्यक पत्रव्यवहाराचा पत्ता दिलेला नाही. वरील कारणामुळे कलम ११(१) खाली कार्यवाही करता आली नाही. सबब, वरील कारणास्तव आपला अर्ज फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी वरील पाचही अर्जाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय देण्यात

याबाबतचाही विचार करावा लागतो. माहिती का देता आली नाही याचे कारण त्यांनी दिलेले आहे. परंतु त्यानंतर अपीलकर्त्यांच्या अर्जाप्रमाणे (दिनांक ३०.११.२००६ च्या) व त्यातही दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जाचा उल्लेख असल्यामुळे माहिती उपलब्ध आहे असे कळविण्यात आले. यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. अन्यथा पुन्हा तेच उत्तर कायम ठेवून माहिती उपलब्ध नाही असेही देता आले असते तसेच बंद केलेला खटला हा सन २००० मधील असल्याने २००६ मधील माहिती अधिकारी यांना ती माहिती उपलब्ध करुन देण्यास जाणून बुजून टाळाटाळा करण्याचे काहीच कारण नाही. व त्यामळे कार्यालयाच्या स्थलांतराची बाब, अभिलेख्यांचा शोध घेणे हे अपरिहार्य असते. व काही वेळेस शोध घेवूनही अभिलेख मिळत नाही किंवा त्यानंतरही मिळतात. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन न देणे किंवा माहिती नाकारणे असा अर्थ काढता येत नाही. व दिनांक १.११.२००६ च्या अर्जातील माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही करीता देता येणार नाही. उपलब्ध असून माहिती नाकारलेली आहे असे नाही. माहिती उपलब्ध झाल्यावर ती पुरविण्यात सुध्दा आली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे तोडी म्हणण्याप्रमाणे जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र नाहीत. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१०.२००६ व ३०.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**दिनांक १२.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

" अर्जदाराने मागितलेली माहिती सन २००० या वर्षातील असल्याने सदर खटल्याची कार्यवाही बंद होऊन रेकार्डला दाखल करण्यात आले होते. अर्जदाराने मागितलेल्या कागदपत्रांचा शोध घेण्यात आला असता सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी कार्यालय सन २००० मध्ये पोलीस जीमखाना शेजारी, सिव्हील लाईन नागपूर येथे कार्यरत होते. सन २००३ मध्ये सदरचे कार्यालय हे तेथून विभागीय आयुक्त कार्यालय परिसर येथे स्थलांतरीत झाले. त्यामुळे अर्जदार यांनी मागितलेली मागितलेली माहितीची कागदपत्रांचा शोध घेतला असता सदर कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाही. सदरचे कागदपत्रे आढळून न आल्याने कार्यालयीन जावक क्रमांक ३६९३, दिनांक १.११.२००६ प्रमाणे विहित मुदतीत कळविण्यात आले होते. सदर रेकार्डचा पुन्हा शोध घेतला असता अर्जदार यांनी मागितलेली क्रं. अ ची माहिती मिळून आल्याने सदरची माहिती अर्जदार यांना घेवून जाण्याबाबत दिनांक १३.१२.२००६ अन्वये कळविण्यात आले. व त्याप्रमाणे अर्जदारातर्फे संदिप मुंजे माहिती घेवून गेले. अर्जदार यांनी अर्जात मागणी केलेल्या माहितीमधील क्रमांक ब व क मध्ये नमूद माहिती अनुक्रमे केस क्रमांक २/२००० च्या न्यायालयाच्या रोजनाम्याची संपुर्ण प्रत व उपरोक्त खटल्यात दिलेला अंतिम निकाल या संदर्भात रोजनाम्यात काही निर्णय नमूद केले असल्यास त्याची प्रत त्यावेळी शोधून मिळून न आल्याने अर्जदार यांना पुरविण्यात आली नव्हती. मात्र प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये पुन्हा कागपत्राबाबत रेकार्ड शोधला असता क्रमांक ब व क मधील कागदपत्रे मिळून आल्याने ती अपीलार्थी यांचेकडे पाठविण्यात आली व अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात आली. पुन्हा शेवटी अर्जदार यांनी माहितीच्या अर्जात मागणी केलेली कागदपत्रे २००० मधील जूने रेकार्ड असल्याने त्याचप्रमाणे सदरचे कार्यालय २००३ मध्ये स्थलांतरीत झाल्याने अर्जदार यांनी मागितलेली माहिती शोधून अर्जदारास पुरविता आली नाही."

या खुलाशावरुन एक निश्चित दिसून येते की, सदरच्या खटल्याची माहिती ही २००० या वर्षातील जूनी आहे व खटला पूर्ण होऊन रेकार्डला दाखल करण्यात आला होता. व त्यानंतर कार्यालय स्थलांतर झाले ही बाब जर खरी आहे असेल तर माहिती उपलब्ध करुन देण्यास जो विलंब झालेला आहे त्याबाबतचा विचार हा त्या पार्श्वभूमीवर करावा लागतो. अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे का

रोजी कार्यालयात हजर झाले. त्यांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. त्यांनी असे सांगितले की, त्यांनी माहिती मागितल्याप्रमाणे अ.क्रं.१ मध्ये नमूद माहिती इस्तगासा व त्यासोबतचे कागदपत्रे माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग यांचेकडून प्राप्त झालेले आहे. अ.क्रं. ब, क मध्ये नमूद रोजनाम्याची प्रत त्यांना मिळाली नसल्यामुळे त्यांनी अपील अर्ज केला आहे. रोजनाम्याची प्रत अ.क्रं. ब अंतिम आदेश (माहिती मागितलेली अ.क्रं. ) मध्ये नमूद आहे. तथापि त्यांचे अपील मान्य करुन त्यांना पुरविण्यात येत आहे." अशा प्रकारे अपीलकर्ता यांचे अपील मान्य करुन त्यांना पुर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. तथापि, अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ७ मध्ये नमूद अर्जाचे निवेदन/विचार हे उपरोधिक स्वरुपाचे असून प्रकरण २००० चे जूने असल्याने अभिलेख्यांची पाहाणी करण्यास अवधी लागेल. अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना पुरवियात आलयाने अपील अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ७ गैर लागू आहे व अपीलकर्ता हे माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. त्यामुळे मुद्या क्रमांक १ ते ७ ची माहिती अर्जदारास देणे संयुक्तिक व आवश्यक वाटत नाही, असा निर्णय दिलेला दिसून येतो.

प्रथम अपीलाच्या निर्णयावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना पुर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. परंतु माहिती उपलब्ध असतानाही उपलब्ध नसल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी नागपूर यांनी अपीलकर्त्यास खोटे कळविले आहे. अपीलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. संपुर्ण माहिती दिली नाही. अर्धवट माहिती दिली. जी काही अर्धवट माहिती दिली ती अपीलकर्त्यांच्या अर्जाच्या तारखेपासून ५७ दिवसानंतर दिली. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००६ चे अर्जान्वये मागितलेली माहिती ही अपीलकर्त्यांनी त्यांच्या
दिनांक ३०.११.२००६ रोजीचे पत्रान्वये मागितलेली माहिती असल्याची खोटी नोंद रेकार्डवर घेतली अशी कारणे दिली आहे.

अपीलकर्ता यांना दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे दिनांक १.११.२००६ रोजी कळविण्यता आले. त्याबाबत प्रथम अपीलात सुध्दा विवेचन केलेले आहे. तसेच राज्य माहिती आयोगाकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी, विभाग यांनी दाखल केलेल्या खुलाशा मध्ये खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१२.२००६ रोजी दिनांक १.१२.२००६ रोजीचा अर्ज असा संदर्भ देवून आपण दिनांक १.१२.२००६ रोजी माहितीचा अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत दिलेल्या अर्जातील माहिती या कार्यालयात उपलब्ध झाली असल्याने आपण आमच्या कार्यालयात येवून कृपया माहिती घेवून जावी असे सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अपीलकर्ता यांना कळविले असून दिनांक १६.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांस ५.४५ वाजता निवासस्थानी प्राप्त अशी नोंद दिलेली दिसून येते. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलाच्या सुनावणीस अर्जदार स्वतः उपस्थित राहाण्यास असमर्थ असल्याने अर्जदारातर्फे अर्जदाराचे प्रतिनिधीस अर्जदाराची बाजू मांडण्याकरीता परवानगी मिळण्याबाबत राज्य माहिती आयोगाकडे विनंती केली आहे. सदरची विनंती मान्य करण्यात येवून श्री संदीप सु. मुंजे यांना अपीलकर्ता यांची बाजू मांडण्याची परवानगी देण्यात आली आहे.

अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द प्रथम अपील केलेले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा खालीलप्रमाणे आहे.

" माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी शहर विभाग यांचेकडून माहिती मिळविण्यात आली. माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २.२.२००७ चे पत्रान्वये कळविले की, अर्जदार श्री दिगंबर विनायक देशपांडे यांनी मागितलेली पोलीस स्टेशन राणाप्रतापनगर इस्तगासा क्रमांक १/२००० कलम १४५ जा.फौ.चे इस्तगासा व त्यासोबत कागदपत्राच्या प्रतीची मागणी केलेली होती. परंतु, प्रकरण २००० चे असल्याने व उपरोक्त खटल्याचे कागदपत्राची पाहाणी केली असता अभिलेख्यात आढळून न आल्याने ते अभिलेखे नसल्याबाबत अर्जदारास कळविण्यात आले होते. तथापि या संदर्भात अधिक बारकाईने पाहाणी व चौकशी केली असता उपरोक्त इस्तगासाची प्रत मिळून आल्याने ती अर्जदारास पुरविण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी इस्तगासाचा सुमार नंबर १/२००० कलम १४५ जा.फौ.चे रोजनाम्याची प्रत दिनांक ३१.७.२००१ रोजीचे अंतिम निकाल आदेश (माहिती आणली आहे) ती प्रमाणित प्रत कार्यालयात पाठविली. तसेच अपीलकर्ता श्री देशपांडे यांना दिलेल्या सूचने प्रमाणे ते दिनांक २४.१.२००७

क) केस क्रं.१/२००० मध्ये मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिताबर्डी विभाग, नागपूर यांनी दिलेल्या अंतिम निकाल (speaking order) ची प्रत दयावी.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १.११.२००६ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी श्री वामन खरात यांनी अपीलकर्ता यांना " आपण दिनांक १६.१०.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत दिलेल्या अर्जातील माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही करीता आपणास माहिती देता येणार नाही "असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी पुन्हा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचेकडे माहिती मिळण्याबाबत अर्ज दाखल केला होता व त्यात आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल यामध्ये दिनांक १६.१०.२००६ रोजी अर्जाच्या संदर्भात उल्लेख केला आहे. माहितीचा विषय यामध्ये सुध्दा दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जाचा उल्लेख केला आहे. त्यानंतर माहितीचा कालावधी दिनांक १७.२.२००० ते १३.३.२००० असा दिलेला आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :

१) आपले कार्यालयातील माहिती आपलेच कार्यालयात उपलब्ध का नाही,याची माहिती दयावी.

२) सदर माहिती आपले कार्यालयात का उपलब्ध नाही याचा आपण कोणकोणत्या कशाप्रकारे शोध घेतला/तपास केला याची माहिती द्यावी.

३) शोध घेतला नसल्यास/तपास केला नसल्यास का केला नाही, याची माहिती द्यावी

४) सदर माहिती/नोंदी(रेकार्ड) सांभाळून ठेवण्याची (maintain) जबाबदारी कोणाची ओ व ती त्याने पार पाडली का याची माहिती द्यावी.

५) उपरोक्त नमूद जबाबदारी संबंधीत व्यक्तीने पार पाडली नसल्यास आपण त्या संबंधीत व्यक्तीविरुध्द कोणत्याप्रकारे कारवाई केली, याची माहिती द्यावी.

६) कारवाई केली नसल्यास का केली नाही याची माहिती द्यावी

७) ज्यामुळे नागरिकांना मागितलेली माहिती मिळत नाही त्यामुळे नागरिकांचे नुकसान होते, यास जबाबदार कोण. त्याविरुध्द आपण काय कारवाई केली, त्याबाबत काय तरतूद आहे, याची माहिती द्यावी. अर्जदार स्वत: माहिती घेवून जाणार आहे.

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६७४/२००८**

**१) श्री दिगंबर विनायक देशपांडे**
**प्लॉट क्रं.७२, पुष्पक अपार्टमेंट, फ्लॉट क्रं. २०४,**
**पांडे ले आऊट,खामला नागपूर-४४००२५.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ क्रं.१, नागपूर शहर, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
**सिताबर्डी विभाग, नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १२.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००६ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अर्जदाराच्या पत्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी, असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :**

अ) अर्जादाराविरुध्द कलम १४५ Cr.P.C. अंतर्गत केस (केस क्रमांक १/२०००) सुरु करण्याबाबत पो.स्टे.राणाप्रतापनगर नागपूर कडून मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिताबर्डी विभाग, नागपूर यांना सादर केलेल्या अहवालाची (त्यासोबत सहपत्र असल्यास त्या सहपत्रांसह) प्रत दयावी.

ब) केस क्रं.१/२००० चे संदर्भातील मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सिताबर्डी विभाग, नागपूर यांचे न्यायालयाच्या रोजनाम्याची संपूर्ण प्रत दयावी.

आहे त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी रुपये ९५८/- चा भरणा करावा व मुद्या क्रमांक ६ ची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये त्यांनी संबंधीत नस्तीची पाहाणी करुन त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे, जन माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणून त्याच्या छायांकित प्रती योग्य ते शुल्क भरुन उपलब्ध करुन घ्याव्या. परंतु अपीलकर्ता यांनी रुपये ९५८/- चा भरणा केल्यानंतरच मुद्या क्रमांक ४ ची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १२.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

इ) अर्जदाराने मागीतलेली मुद्या क्रं.७ व ८ ची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) अन्वये माहितीच्या व्याख्येअंतर्गत येत नाही. अर्जदाराने कार्यालयात अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती मागीतलेली नव्हती. तर अर्जदाराचे प्रश्न वाचून त्यावर माहिती अधिकारी यांना आपले मत नोंदवावे लागेल अशी माहिती मागीतलेली आहे. जी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये पुरविणे अभिप्रेत नाही.

ई) अर्जदाराचा अर्ज हा योग्य कारणांसाठीच फेटाळण्यात आलेला आहे.

६) अर्जदाराचे प्रकरण या समितीसमोर सुरु आहे आणि जेव्हा एखादे प्रकरण एखाद्या न्यायाधिकरणासमोर सुरु असेल तेव्हा त्यातील दस्ताऐवजांच्या प्रती साध्या अर्जाद्वारे मागणी केल्यावर सुध्दा मिळतात त्यासाठी माहिती अधिकाराचा उपयोग करुन त्रास देणे उचित नाही.

७) करीता मा. राजय माहिती आयुक्त यांना नम्र विनंती करण्यात येते की,उपरोक्त नमूद कारणास्तव अर्जदाराचे अपील हे खारीज करण्यात यावे."

सदरच्या खुलासा मधील मुद्या क्रमांक ४ मध्ये अपीलकर्ता यांनी रुपये ३४/- इतके शुल्क जमा केले आहे मात्र, त्यांना दिनांक २१.११.२००६ च्य पत्राप्रमाणे मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भामध्ये शुल्क रुपये ९५८/- जमा केलेले नाही असे म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे सदरचे विहित शुल्क रुपये ९५८/- त्यांनी जमा केलेले नसल्यामुळे त्यांना सदरच्या आदेशाची माहिती पुरविण्यात आली नाही व तोच निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कायम केलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक ६ च्या माहितीचे विहित शुल्क रुपये ९५८/- जमा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

अपीलकर्ता हे स्वतः शासकिय अधिकारी असून सुध्दा व स्वतः माहिती अधिकारी असून सुध्दा ते इतर कार्यालयामध्ये माहिती मागताना असभ्य भाषा वापरतात असे दिसून येते व त्यांना अपीलाचे कारण काय असावे याबध्दलचे ज्ञान दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती त्यांना हवी असल्यास त्याकरीता त्यांनी रुपये ९५८ चा भरणा करणे हे संयुक्तिक राहील. तसेच मुद्या क्रमांक ४ संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे

४. दिनांक ६.१२.२००६ रोजी अर्जदार कार्यालयात आले त्यांनी त्यांच्या प्रकरणातील हव्या असलेल्या दस्ताऐवजांवर खुणाकरुन दिल्या व त्या खुणावरुन दिलेल्या दस्ताऐवजांच्या छायाप्रती त्यांच्या समोरच काढून त्यांना दिल्या त्याचे विहिती शुल्क रु. ३४/- त्यावेळी त्यांनी कार्यालयात जमा केले. मात्र मुद्या क्रं. ६ च्या माहितीचे विहित शुल्क रुपये ९५८/- (अक्षरी रुपये नऊशे अठठावन्न फक्त) त्यांनी जमा केलेले नसल्याने त्यांना सदर मुद्याची माहिती पुरविलेली नाही. माहित नेते वेळी त्यांनी अचूक माहिती मिळाली नसल्याचे लेखी अथवा तोंडीही म्हटले नाही.

मुद्या क्रं. ७ अन्वये त्यांनी न्यायामध्ये पारदर्शकता असण्याकरीता वरील अ.कं. १ ते ५ चे दस्ताऐवज संबंधीतास म्हणजे मला देणे आवश्यक असता अद्याप दिले नाही. माझेच दस्ताऐवज मला न देणे संयुक्तिक आहे किंवा नाही याची विचारणा केली. मुद्या क्रं. १ ते ६ ची माहिती त्यांना विहित शुल्क जमा करुन घेऊन जाण्यास सांगितले असल्याने सदर बाबीवर भाष्य करण्याची गरज वाटली नाही. शिवाय मुद्या क्रं. ८ मध्ये ही त्यांनी विचारणा केली की जीवंत असे पर्यंत न्याय मिळेल का. या दोन्ही मुद्यांची माहिती अर्जदाराने माहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली आहे.ज्यावर माहिती अधिकारी यांना स्वत:चे मत नोंदवावे लागेल. सदर अधिनियमान्वये माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचे प्रश्न वाचून त्यावर स्वत:चे मत नोंदविणे अभिप्रेत नसून कार्यालयात जी माहिती अभिलेख्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे तीच माहिती पुरविणे अपेक्षीत आहे त्यामुळे कलम २ (च) अन्वये सदर माहिती, माहितीच्या व्याख्येत येत नसल्याने सदर मुद्यांवर भाष्य केले नाही.

५. अर्जदाराने केलेली मागणी लक्षात घेता अर्जदाराचे उपरोक्त नमूद अपील पुढील कारणास्तव खारीज करण्यात यावे ही विनंती.

अ) अर्जदाराच्या अर्जावर विहित वेळेत उत्तर देण्यात आलेले आहे.

ब) अर्जदारास चुकीची, दिशाभूल करणारी किंवा अपूरी माहिती पुरविलेली नाही.

क) अर्जदारास देय असलेली माहिती पुरविली आहे

ड) मुद्या क्रं.६ च्या माहितीचे विहीत शुल्क रु. ९५८/- जमा करुन माहिती नेण्यास कळविलेले असतांना देखील अर्जदाराने माहिी नेली नाही यास सर्वस्वी अर्जदारच जबाबदार आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये शासकिय माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलास दाखल केला आहे.

**खुलासा-**

" १.श्री राजपूत, पोलीस दक्षता पथक, अमरावती यांनी सन २००३ मध्ये दिलेल्या अहवालाची प्रत.

२. श्री पाटील पोलीस दक्षता पथक, अमरावती यांचे पुनर्तपासणी अहवाल सन २००४ व २००५ चे अहवालाची प्रत.

३. माझे कडून २००३,२००४,२००५ मध्ये दक्षता पथकाने लिहून घेतलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत

४. दक्षता पथक व कार्यालय यांनी केलेला पत्रव्यवहार त्याच्या प्रती

५. दक्षता पथक अमरावती यांनी आपल्या कार्यालयास सादर केलेल्या कोतवालबुकाच्या सत्यप्रती (आत्या, आई, आजोबा इत्यादि)

६. दिनांक १.१.२००१ ते आजपर्यंत दिलेल्या वैध, अवैध प्रमाणपत्रांची यादी

७. न्यायामध्ये पारदर्शकता असण्याकरीता वरील अ.क्रं. १ ते ५ दस्ताऐवज संबंधीतास म्हणजे मला देणे आवश्यक असता अद्याप दिले नाही माझेच दस्तऐवज मला न देणे संयुक्तिक आहे किंवा नाही.

८. जिवंत असे पर्यंत न्याय मिळेल का.

३. अर्जदार श्री सुरेश प्रभाकर सोनकुसरे यांचा उपरोक्त अर्ज या कार्यालयाचे आदेश क्रं.५२०५ दिनांक २१.११.२००६ अन्यये निकाली काढलेला होता सदर आदेशान्वये त्यांना मुद्या क्रं. १ ते ५ ची माहिती स्वतः कार्यालयात येऊन घेऊन जावे जेणे करुन त्यांना त्यांच्या प्रकरणातील आवश्यक ते नेमके दस्ताऐवज विहित शुल्क जमा करुन नेता येतील व मुद्या क्रं. ६ च्या माहितीचे विहित शुल्क ९५८/- होत असल्याचेही त्यांना कळविले होते.

अर्जदार यांनी यापूर्वीही माहितीच्या अधिकाराअंतर्गत अनेक अर्ज या कार्यालयाकडे केलेले होते वेळोवेळी त्यांना कायद्यान्वये देय असलेली माहिती ही पुरविलेली होती तथापि त्यांचे complentive nature पाहता त्यांना त्यांच्या प्रकरणातील जी माहिती पाहिजे ती माहिती त्यांनी समक्ष हजर राहून घेऊन जावी असे सांगितले जेणे करुन त्यांचे समाधान होईल.

४) दक्षता पथक व कार्यालये यांनी केलेला पत्र व्यवहार त्याच्या प्रती

५) दक्षता पथम अमरावती यांनी आपलया कार्यालयास सादर कलेल्या कोतवाल बुकांच्या सत्यप्रती (आत्या, आई, आजोबा ई.)

६) दि.१.१.२००१ ते आजपर्यंत दिलेल्या वैध/अवैध प्रमाणपत्रांची यादी

७) न्यायामध्ये पारदर्शकता असण्याकरीता वरील अनु.क्रं.१ते ५ दस्तऐवज संबंधीतास म्हणजे मला देणे आवश्यक असता अद्याप दिले नाही. माझेच दस्तऐवज मला न देणे संयुक्तिक आहे किंवा नाही.

८) जिवंत असेपर्यंत न्याय मिळेल काय.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.११.२००६ रोजी अर्जदार यांनी स्वत: येवून ५ मुद्यांची माहिती घेवून जावी कारण त्यांना त्यांच्या प्रकरणातील आवश्यक ते नेमके दस्तऐवज विहित फी भरुन नेता येतील. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक ६ च्या माहितीची विहीत फी रुपये ९५८/- (रुपये नऊशे अठठावन्न) आहे. ती त्यांनी स्वत: दिनांक २.१२.२००६ रोजी घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००६ रोजी ३४/- रुपयाचा भरणा केलेला दिसून येतो व माहिती उपलब्ध करुन घेतलेली दिसते. मात्र दिनांक २५.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी दक्षता पथक व जात पडताळणी कार्यालय यांच्या पत्रव्यवहाराच्या प्रती मिळाल्या नाही, मुद्या क्रमांक ६,७,८ ची माहिती मिळाली नाही. दिनांक १.१.२००१ ते आजपर्यंत अवैध प्रमाणपत्राची यादी मिळाली नाही. न्यायामध्ये पारदर्शकता असण्याकरीता मला माझे दस्तऐवज आजपर्यंत न देण्याचे कारण. ४) जीवंत असेपर्यंत न्याय मिळेल काय.

सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक २३.१.२००७ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. माहिती अधिकारी यांनी देय असलेली सर्व माहिती अपीकर्ता यांस पुरविली आहे व पुरविण्यास तयार आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज फेटाळण्यात येत आहे असा निर्णय देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

झाल्यास शास्ती लादण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे मांडण्यास वाजवी संधी देण्यात यावी, अशी तरतूद आहे.

वरील कलमातील कारणांचा विचार केल्यास जन माहिती अधिकारी यांनी जो खुलासा केलेला आहे व माहिती उपलब्ध करुन देण्याचा जो प्रयत्न केलेला आहे व त्यात त्यांनी माहिती ही जूनी व विस्तृत स्वरुपाची होती, उपलब्ध कां करुन देता आली नाही याचाही खुलासा केला आहे व माहिती देण्यास कोणत्याही प्रकारे टाळाटाळ केलेली नाही  हे त्यांनी वेळोवेळी माहिती संकलीत करण्याकरीता जे पत्र दिलेले आहे त्यावरुन आयोगाचे मत झालेले आहे व तसेच मुळात अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती १९९० पासून व ६६ ग्रामपंचायत क्षेत्रातील असून तसेच ती निरनिराळया विभागातील असून ती एकत्रित एकाच अर्जात मागितलेली असल्यामुळे ती व्यापक आहे असेही आयोगाचे मत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र नाहीत. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेली उर्वरित माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशता मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहिती प्रमाणे उर्वरित माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत संकलीत करुन विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १२.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

देण्यास टाळाटाळ केलेली आहे, असे दिसून येत नाही. माहिती विस्तृत जुनी व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे अर्थातच अशा प्रकारची माहिती एकाच विभागत संकलीत नसेल तर ती ३० दिवसांच्या आंत उपलब्ध करुन देणे हे शक्य होत नाही. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे ज्या वेळेस त्यांना माहिती उपलब्ध झाली त्या त्या वेळेस ती माहिती त्यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली आहे व अपीलकर्ता यांनी सुध्दा त्याबध्दलची पोच दिली आहे. परंतु अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती दिनांक २१.३.२००७ नंतर सुध्दा उपलब्ध झाली नाही त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, ग्रामसेवकांच्या संघटनेच्या माध्यमातून सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत.परंतु प्रशासकिय माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता संघटनेचा उपयोग करणे याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, ग्रामसेवकांचे असहकार आंदोलन सुरु असल्यामुळे संघटनेस विश्वासात घेतल्याशिवाय अशा प्रकारची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही व म्हणून संघटनेच्या माध्यमातून सदरची माहिती उपलब्ध करुन घेवुन अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली.

अपीलकर्ता यांनी जो खुलासा दाखल केला आहे त्या खुलाशा मध्ये सुध्दा माहिती अधिकारी यांनी सर्व ग्राम पंचायतींना पत्र देवून माहिती देण्यासंबंधी कळविले असताना सुध्दा अद्याप माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले आहे. तसेच खुलाशामध्ये अपीलकर्ता यांनी नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) प्रमाणे राज्य जन माहिती अधिकारी कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्विकृत करण्यास नकार दिला आहे किंवा कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये विर्निदिष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली नाही किंवा माहिती मिळविण्यासाठी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारली आहे किंवा जाणूनबुजून चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली आहे किंवा मागितलेली माहिती नष्ट केली आहे किंवा माहिती सादर करण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे असे आयोगाचे मत झाले असेल तर माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रुपये २५०/- इतकी शास्ती लादेल. तथापि, अशा शास्तीची एकुण रक्कम रुपेय २५,०००/- पेक्षा अधिक असणार नाही व शास्ती लादावयाची

रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती असे दिसून येते व त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचे आदेश रोजनाम्यावर दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ५.३.२००७ ला या कार्यालयात सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आली असून सदर विषयाची माहिती आपणास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांचेकडून प्राप्त होताच पुरविण्यात येईल असे पत्र दिलेले दिसून येते. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची तारीख २०.३.२००७ रोजी दिलेली आहे असे अपलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. पुन्हा दिनांक २१.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती दिनांक २०.३.२००७ पर्यंत सादर करण्याबाबत सूचना केली होती परंतु गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांचेकडून अद्यापपर्यंत आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयास प्राप्त झ ालेली नसल्यामुळे आपल्या संदर्भीय अर्ज क्रमांक ३ नुसार आपणास माहिती देणे शक्य झाले नाही. आपल्या संदर्भिय अर्ज क्रमांक ३ चे नुसार माहिती देण्यात येत आहे, असे कळविण्यात आलेले दिसते व त्या पत्राची प्रतिलीपी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांना दिलेली दिसते.

अपीलकर्ता यांचे दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती का उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही विस्तृत स्वरुपाची होती व ती एका विभागात संकलीत झालेली नाही. ती वेगवेगळया विभागातून उपलब्ध करुन घेवून नंतरचा पुरविण्यात येईल व त्याकरीता अपीलकर्ता यांना वेगवेगळया विभागाला व ६६ ग्राम पंचायतीच्या ग्रामसेवकांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता वर नमूद केलेले पत्र दिलेले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची माहिती ही १९९० पासून ते २००६ पर्यंत जी वेगवेगळया विभागाची व वेगवेगळया योजनांची माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचा माहिती मिळण्याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दिनांक १९.१०.२००६ रोजी माहिती संकलीत करण्याकरीता पत्र दिले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन

४) वसुलीयोग्य मुद्यानुसार दोषी कर्मचा-यां विरुध्द केलेल्या कार्यवाहीचा वर्ष निहाय सविस्तर माहिती.

५) ग्रा.पं.ऑडीट आक्षेपाची संख्या जसे जवाहर रोजगार योजना, जवाहर ग्राम समृध्दी योजना, संपूर्ण ग्रामिण रोजगार योजना, सामान्य निधी बाबत ऑडीट आक्षेपांची वर्ष निहाय माहिती तसेच हया बाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर व स्वतंत्र अहवाल.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद कले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९.१०.२००६ रोजी संवर्ग विकास अधिकारी, बाळापूर यांनी पंचायत विभागास सदर माहितीच्या अर्जातील आपल्या विभागशी संबंधी माहिती १५ दिवसांचे आंत सादर करावी अन्यथा होणा-या विलंबास आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी व त्या पत्राची प्रत सर्व सचिव, ग्राम पंचायत व सामान्य प्रशासन विभाग, पंचायत समिती, बाळूपर यांना दिलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना आस्थापना १ व २ या विभागाची माहिती संकलीत झाली असून आपणास या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच उर्वरित विभागाची माहिती संकलीत करण्याचे कार्य सुरु असून माहिती संकलीत झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते.सदरची माहिती मिळाल्याची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून यते. पुन्हा दिनांक १६.१२.२००६ रोजी कृषि विभागाची माहिती संकलीत झाली असून लेखा आक्षेपासंबंधीची माहिती या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसते. त्यानंतर दिनांक २६.१२.२००६ रोजी पुन्हा लेखा आक्षेपाबाबत आपण मागितलेली माहिती पंचायत व लेखा विभागाकडून प्राप्त झाली आहे. पंचायत विभागाकडून ८ ग्रामपंचायतीची माहिती व लेखा विभागाकडून जवाहर ग्राम संमृध्दी योजना, जवाहर रोजगार योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना इ. योजनाशी संबंधीत माहिती या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. सदरची माहिती उपलब्ध झाल्याबध्दल अपीलकर्ता यांनी पोच दिलेली दिसून येते.

परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे दिनांक २०.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी दिनांक २२.२.२००७ रोजीच्या पत्राप्रमाणे दिनांक ५.३.२००७

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६१९/२००८**

**१) श्री नारायण शामराव लांडे**
**रा.सांगवी (जोमदेव) ता. बाळापूर, जिल्हा अकोला. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)**
**जिल्हा परिषद, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती, बाळापूर, ता. बाळापूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १२.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :** १) सन १९९० पासून ते २००६ पर्यंत ऑडीट आक्षेप अंकेक्षण अहवालानुसार वसुलीयोग्य आक्षेपामधील मुद्यांमध्ये दोषी असलेल्या ग्रामसेवक तसेच कर्मचारी यांची नावे व त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीचा स्वतंत्र व वर्ष निहाय हया बाबत सविस्तर माहिती.

२)सन १९९० पासून ते २००६ मधील स्थानिक निधी लेखा यांनी बाळापूर पं.स.वर तसेच ग्राम पंचायतीवर घेतलेल्या ऑडीट आक्षेपाची वर्ष निहाय माहिती.

३) या आक्षेपावरून सचिवा कडून तसेच कर्मचा-यां विरुध्द वसुली योग्य वर्ष निहाय मुद्यांची माहिती.

विरणपत्राच्या सहीत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे. परंतु नगरपरिषदेच्या नगराध्यक्षाने तयाच नगरपरिषदेतील माहिती ही त्यांच्याच मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांना माहितीच्या अर्जाचे माध्यमातून मागणे हा माहितीच्या अधिकाराचा गैरवापर आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या ज्या छायांकित प्रती वाचण्यायोग्य नसतील त्या छायांकित प्रती पुन्हा स्पष्टपणे वाचता येतील अशा छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या. व सदरची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिल्यानंतर अपीलकर्ता यांनी पोच द्यावी. तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये मुद्या १ ते ४ च्या संदर्भामध्ये विवरणपत्राची छायांकित प्रत ही हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी व त्याबाबत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना पोच द्यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ११.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

सुध्दा दाखल केले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी ज्या कारणास्तव अपील दाखल केले, त्या कारणाच्या संदर्भामध्ये अपीलार्थी हे स्वत: जर हजर आहेत तरी त्यांचे पती यांना मुद्दे मांडण्यास परवानगी देण्यात आली आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील तरतुदी मधील नियम ७ नुसार अवांतर व्यक्तीची मदत घेण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे व त्याकरीता त्यांनी सेंट्रल इन्फार्मेशन कमिशन (अपील प्रोसिजर रुल, २००५) ची प्रत दाखल केली आहे. परंतु सदरचे नियम हे केंद्र शासनाने पारित केलेले असून ते केंद्रिय माहिती आयोगास लागू होतात. राज्य माहिती आयोगास सुध्दा अपील कार्यपध्दतीच्या नियमाची आवश्यकता आहे व त्याप्रामाणे राज्य शासनास सदरचे नियम पारित करण्याचे अधिकार कलम २७ (१) (३) प्रमाणे शासनास आहे. परंतु, राज्य शासनाने आतापर्यंत अपील कार्यपध्दतीचे नियम पारित केलेले नाही. व अधिनियमामध्ये कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीची मदत घेण्याची तरतूद नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्याकरीता जो आक्षेप घेतला होता तो आक्षेप हा अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे आहे. व त्याबध्दल द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी कोणतीही तक्रार नमूद केलेली नाही.

असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत त्या वाचता येत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांना ज्या ज्या छायांकित प्रती वाचता येत नसेल त्या दस्तऐवजाच्या पुन्हा छायांकित प्रती स्पष्टपणे वाचता येतील अशा प्रकारच्या उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, त्या माहितीच्या पत्रामध्ये ४ मुद्यांच्या संदर्भात माहितीचे विवरणपत्र सुध्दा जोडलेले आहे असे म्हटलेले आहे. आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये सदरचे विवरणपत्र आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ते विवरणपत्र उपलब्ध करुन दिले नाही. परंतु त्यांनी त्याबाबतचा आक्षेप नोंदविलेला नाही. कारण त्यांनी महिती शुल्क भरुन माहिती घेतलेली आहे त्यामुळे त्यांनी तशी काळजी घेऊन आक्षेप नोंदवावयास पाहिजे होता. असे असले तरी सदरची माहिती पुन्हा

सुनावणीच्या वेळी मुख्याधिकारी, नगर परिषद यांचे प्रतिनिधी श्री कैलास इरतकर, सहाय्यक माहिती अधिकारी हजर होते व अपीलार्थी सुध्दा हजर होते. अपीलार्थी हे स्वत: नगर परिषदेचे अध्यक्ष आहेत. कागदपत्रांची पडताळणी केली असता अपीलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती दिनांक २२.१.२००७ च्या पत्रानुसार उपलब्ध करुन दिल्याबाबत नगर परिषदेचे माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. "अपीलार्थी यांनी त्यांच्या वतीने प्रकरणात त्यांचे पतीना प्रतिनिधीत्व देण्याचा आग्रह धरला. अपीलकर्ता हे स्वत: अध्यक्ष असल्यामुळे त्यांना प्रतिनिधीत्व देण्याची काही गरज नव्हती असे माझे मत झाले. त्यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याची नोंद त्यांच्याकडे दिनांक २७.२.२००७ च्या पत्रात नमूद आहे. अपीलकर्ता यांना कार्यालयातील उपलब्ध दस्तऐवजावरुन माहिती देण्यात आल्यामुळे ती चुकीची व अपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही, करीता अपील खारीज करण्यात आले आहे."

सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळै अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलामध्ये सुध्दा त्यांनी अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग आयुक्त यांचे कार्यालय यांनी अपील कार्यपध्दती नियम २००५ मधील भाग ७ मधील (२) व (४) नुसार मुद्दे सादर करण्याकरिता माझे पती तथा माजी नगराध्यक्ष यांची उपस्थिती नाकारुन मुद्दे मांडण्यास हरकत घेतल्यामुळे. अपील अधिका-याने अपील पध्दतीमधील कलम ७ नुसार अवांतर व्यक्तीची मदत घेण्यासाठी नकार दिल्यामुळे. अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक २८.२.२००७. अपीलाची कारणे : अपील अधिका-याने माहिती न देणा-या अधिका-याविरुध्द मुद्दे मांडण्याकरीता मदत न घेऊ दिल्यामुळे, असे माहितीचे स्वरुप व विषय हा अर्जात दिल्याप्रमाणे आहे.

मुख्याधिकारी नगर परिषद यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल करताना मागितलेल्या १ ते १० मुद्यांबाबत सर्व माहिती पुरविण्यात आलेली असल्याबाबतची माहिती, माहितीची कार्यालयीन प्रत अवलोकनार्थ सोबत सादर करण्यात येत आहे, असा खुलासा दिलेला आहे. सोबत मागितलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती सादर केलेल्या आहेत. त्यामध्ये जानेवारी, २००६ ते डिसेंबर, २००६ मध्ये क्रमांक १,२,३,४ व ८ बाबतची माहितीचे विवरण पत्र

(५) म.न.पा.अधिनियम १९६५ चे कलम ३०९ अंतर्गत किती देयकाचे जिल्हाधिकारी यांनी मंजूरी दिल्याची तसेच आदेशाची प्रत

(६) म.न.पा.अधिनियम १९६५ चे कलम ३०९ अंतर्गत निकडीची परिस्थिती जिल्हाधिकारी यांनी सदरहू कामे करण्याकरीता आदेशाची माहिती.

(७) जिल्हाधिकारी यांचेकडे म.न.पा.अधिनियम १९६५ चे कलम ३०९ अंतर्गत पाठविलेल्या सर्व प्रस्तावाची माहिती.

(८) देयकाचे प्रमाणक क्रं. व चेक नंबर क्रमांक व रक्कम याची संपुर्ण माहिती

(९) प्रत्येक दिलेल्या देयकाचे फाईल अध्यक्षाकडे पाठविली असल्यास त्याची शे-याची मारल्याची नोट शिट

(१०) अध्यक्षाची सही न घेता / मंजूरी न घेता काढलेल्या सर्व कामाच्या प्रशासकीय मंजूरीपासून अंतीम देयके प्रदान करण्यापर्यंत केलेल्या संपुर्ण कार्यवाहीची कामाची व प्रक्रियेची कागदपत्रे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१.२००७ रोजी अर्जदाराने सदर तारखेतील माहितीच्या अधिकाराच्या अर्जानुसार माहिती तयार करण्यात येवून माहिती करीता लागणारे रुपये २६६/- शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता अर्जदार यांना रिसोड नगर पालीकेचे पत्र जावक क्रमांक ५४/२००७, दिनांक २५.१.२००७ अन्वये माहिती पुरविण्यात आली आहे. सदरच्या पत्रावर स्वाक्षरी असलेली पोच उपलब्ध आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ (१४.२.२००७) रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलामध्ये चुकीची व अपूर्ण माहिती दिल्याबाबत तसेच अध्यक्षाची स्वाक्षरी न घेता किंवा मंजूरी न घेता काढलेल्या देयकांची प्रशासकिय मान्यते पासून अंतीम देयकापर्यंत केलेल्या सर्व कार्यवाही कागदपत्रे असे माहितीचे स्वरुप व विषय दिलेला आहे. परतु चुकीची व अपूर्ण माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला दिसून येत नाही. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.३.२००७ रोजी देण्यात आलेला दिसून येतो.

अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे तत्कालीन सचिव, ग्राम पंचायत खैरा यांनी विहित माहिती उपलब्ध करुन दिली असे दिनांक २१.१.२००७ चे पत्रावरुन दिसते परंतु माहिती प्राप्त झाल्याची सही ही अपीलकर्ता यांची दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता हजर नसल्याने त्याबाबत खात्री करुन घेता येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे, असे दिसून येते. व त्याबाबत त्यांना ताकीद देणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत खैरा यांचे ताब्यातील मूळ कागदपत्रांची तपासणी करावी व तत्कालीन सचिव श्री वडयाळ यांची सही आहे व अपीलकर्ता यांची सही आहे याची तपासणी करावी व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यास ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २९.१.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिल्याच पोच दिली त्याबध्दल हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत चौकशी करण्यात यावी व चौकशी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यास त्यांना रजिस्टर पोस्टाने विना मुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

३) सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक १०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

